प्रकरण ३ रे

नामदेवकृत ज्ञानेश्वर चरित्र

पृष्ठ कमांक ०४० - ०९६

# नामदेवलेखन प्रेरक तत्वे व स्वरुप

आपल्या अभंग संकीर्तनाने मराठीचे राऊळ दुमदुमून सोडलेल्या नामदेवांनी हरिनामाचा सुकाळ एवढया जीवाभावाने केला की 'विठ्ठलाच्या' नावाला त्यामुळे एक प्रकारची भव्यता प्राप्त झाली. रात्रंदिवस विठ्ठलाच्या चिंतनात असताना त्यांनी आपल्या बुध्दीला आणि मनाला एवढा शीण येऊ दिला की त्यामुळे त्या संबंधातील त्यांच्या कवित्वाने बहारीत्ने कल्पना वैभव प्रकट केले. आपण स्वत: आणि आपले आराध्य दैवत "श्री विठ्ठल" यांच्यामधील सहवासात अगर जवळीकतेत कसलाही खंड पडू नये याची खबरदारी घेण-या नामदेवांनी आपला मनोभाव प्रकट करताना भाषेच्या साधेपणातील रहस्य लक्षात घेतले. तिच्या माध्यमातून आपले मन मोकळे करण्याचा प्रयत्न केला. आणि

"भक्तीचे ते गाणे बोबडीया बोली । तेते विठ्ठली अर्पियली ॥
तूंचि माझे व्रत, तूचि माझे तीर्थ । तुचि धर्म, अर्थ, काम देवा ॥१॥"

आपल्या जीवनाचे सार या रितीने सांगून टाकले.

"नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ॥"

ही भूमिका स्विकारुन भागवत धर्माच्या प्रचाराचा झेंडा हाती घेतला. त्यामुळेच तर त्यांची ही कविता त्यांच्या आत्मविष्काराचे साधन बनली.

**नामेदवांचे लेखन माध्यम - कवित्व :-**

विठ्ठल भक्तीचा आपला छंद पुराकरण्यासाठी "प्रेम सुख गोडी " चा भरपूर आस्वाद घेऊन तो इतरांना देऊ करणे शक्य व्हावे म्हणून नामदेवांनी कवित्वाचे माध्यम स्विकारले. त्यामुळे त्यांच्या काव्य लेखनाची पार्श्वभूमी ही परमेश्वराबद्दलच्या नितांत श्रध्देवर आणि पराकाष्ठेच्या पूज्य बुध्दीवर आधारली गेली. प्रत्यक्ष स्वानुभवावर त्यांचे लेखन झाल्या कारणाने त्यास एक प्रकारचे ऐतिहासिक महत्वही प्राप्त झाले.

श्री नामदेवांनी केवळ काव्यलेखन करावे या हेतूने काव्यशक्तीला राबवले नसून आपल्या ठायी उत्पन्न होणा-या सहजोद्गाराचे माध्यम म्हणून तिचा स्वीकार

केला. आपल्या आत्मोद्गाराने त्यांनी पंढरीच्या पांडुरंगाची सेवा केली. त्यांच्या काव्य लेखनाची पार्श्वभूमी ही परमेश्वराबद्दलच्या नितांत श्रध्देवर आणि पराकाष्ठेच्या पूज्य बुध्दीवर आधारली गेली.

आपल्या कवितेमधून नामदेवांनी त्या त्या वेळच्या आपल्या प्रबळ अशा मनोभावांची स्वाभाविक अशी मांडणी केली आहे. त्यामुळे त्यांच्या अभंगातून विठ्ठल प्रीतीची उत्कटता आढळून येते. भगवत प्रेमाच्या विविध छटा निरनिराळया भूमिकांचेमधून नामदेवांनी मोठया सहजतेने साकार केल्या आहेत.

ज्ञानेश्वर, नामदेवादि संतंकवी हे मुख्यत: साक्षात्कारी संत होते. त्यांनी काव्यरचना केली ती केवळ ईश्वर भक्तिचेच एक साधन मानून केली. कीर्तनाव्दारे केल्या जाणा-या भक्तिचे माध्यम म्हणून नामदेवांनी अभंग रचना केली.

नामदेवांच्या अशा कवित्वामुळे सामान्य जनांच्या बुध्दीला सहजतेने मोठा चटका लागून राहिलेला आहे. अनेकांच्या वाचनामध्ये, पठणामध्ये, गायनामध्ये वारक-यांच्या भजन किर्तनामध्ये नामदेवांच्या कवितेने आपले वेगळे स्थाननिर्माण केले आहे. त्यामध्ये श्रध्दा उभी ठाकली आहे तर भक्ती उचंबळून आली आहे. त्या कारणाने 'अमृताहुनी गोड नाम तुझे देवा ।' असे नामदेवांनी कां म्हटले असावे याचा उलघडा होतो.

<u>नामदेवाचे पद्यातून लिहिलेले आद्य ज्ञानेश्वर चरित्र:-</u>

श्री ज्ञानदेवांचे चरित्र हा जसा भाविकांच्या श्रध्देचा तसा विद्वानांच्या चर्चा चिकित्सेचा विषय आहे. ज्ञानदेवांच्या चरित्रातील प्रमुख घटना प्रसंगांच्या अनुषंगाने गेली शंभर एक वर्षे तरी अव्याहतपणे चर्चा चालली आहे. ज्ञानदेवांची चरित्र एवढे असाधारण आहे की ते आपणा सर्वांना अचंबित करुन टाकते. अवघे एकवीस वर्षे, तीन महिने, पाच दिवसांचे आयुष्य आणि एवढयाशा कालमर्यादेत त्यांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्ठी आणि स्फुट अभंग अशी काव्यरचना केली. असामान्य अध्यात्मिक सामर्थ्य आणि तितकेच भव्य काव्य कर्तृत्व अंगी बाळगणा-या ज्ञानदेवांनी वयाची अवघी एकवीस वर्षे



13306

4

उलटल्यावर जिवंत समाधी घेवून आपले लैकिक जीवन संपवावे.[२] ही आश्चर्यचकीत करुन टाकणारी घटना आहे.

परंतु या महान संत श्रेष्ठांच्या चरित्रांविषयी फारशी माहिती आपल्याला मिळत नाही. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांवर भरपूर लेखन पहावयास मिळते. परंतु चरित्र मात्र फारसे उजेडात आणले गेलेले नाही.

श्री संत नामदेवांनी मात्र "नामदेव गाथे" मध्ये ज्ञानदेवांचे चरित्र आपल्या पदय पंक्तीमधून रसाळपणे उतरविले आहे. त्यामध्ये त्यांनी आदि - तीर्थावळी - समाधि असे तीन टप्पेपाडून ज्ञानेश्वरांचे चरित्र आपल्यासमोर साकार करताना नामदेवांची वाणी मोठी रसाळ उतरलेली आहे. त्यांच्या या लेखनात कल्पनेच्या उत्तुंग भरा-या नसल्या तरी भाविकतेची संपन्नता जरुर आहे.

तिर्थयात्रेला जाण्यासाठी म्हणून ज्ञानदेव ज्यावेळी नामदेवांना बोलविण्यासाठी आले त्या वेळी [३]

नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटांगण घातले नामदेवे ॥१॥
देऊनि अलिंगन प्रीतीच्या पडिभारे । पूजिले आदरे यथा विधी ।
धन्य तो अवसरु संतसमागमू । करीतसे संभ्रमु आवडीचा ॥३॥
नामदेव म्हणे सकळ माझे जिणे । स्वामीच्या दर्शने धन्य जालो ॥४॥
( अ.क. ९०३)

पूर्व पुण्य माझे फळोन्मुख जाले। प्रत्यक्ष भेटले पांडुरंग ॥१॥(अ.क. ९०४)
नामदेव आनंदाने भारावून गेले आणि -

हांसोनि पंढरिनाथ पाहे नाम्याकडे । म्हणे नवल केवढे भाग्य तुझे ॥१॥
प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति ज्ञानेश्वर । करितसे आदर संगतीचा ॥२॥
ऐसे भाग्य जेणे सर्वस्वे साधावे । तरिच जन्मायावे विष्णूदासा ॥३॥
जावे स्वस्तिक्षेम यावे शीघ्रवत । करावे स्वहित कळेल तैसे ॥४॥
सर्व भावे आमचा विसर न पडावा । लोभ असो दयावा मजवरी ॥५॥
( अ.क. ९०८)

खुद्द विठ्ठलाचीही अवस्था झाली त्या कारणाने नामदेवांची अशी कविता वाचताना वाचकही भवसिंधूत हेलावून उठतो, त्या भावनाविष्कारात तल्लीन होवून जातो. म्हणून हे भावमधूर आणि आत्मनिष्ठ काव्य वाचण्याचा किंवा ऐकण्याचा मोह भविक, श्रध्दाळू मनाला टाळता येत नाही.

# आदि

ज्ञानदेवांचे [४]चरित्र हे अलौकिकाचा सदैव सुखद असा शीतल प्रकाश अखंड स्त्रवणारे एकदिव्य रत्नच आहे. यामध्ये मात्र दोन गोष्टींची जाणीव झाल्याशिवाय रहात नाही. एक म्हणजे - ज्ञानदेवांच्या जीवनात वैयक्तिक, लौकिक आशा आकांक्षांच्या परिपूर्ती करता करावयाची धडपड मुळीच आढळत नाही. आणि दुसरी म्हणजे - ज्ञानदेवांनी आपले वाङ्:मय लौकिक लाभाचे वा संसारीक सफलतेचे पाठ देण्याकरता लिहिलेले नाही. त्यांनी "ज्ञानेश्वरी " या ग्रंथाला 'अलौकिक ग्रंथ' असे म्हटले आहे. त्यातील अन्वर्थता मनोमन पटल्याशिवाय रहात नाही.

अलौकिक विभूतिमत्वाचे हे अमर फळ ज्या वंश वृक्षाला लागले त्याची अपूर्वता आणि पवित्रता किती वानावी ! या वंश वृक्षातला शेवटला ज्ञान पुरुष हरिहरपंत कुलकर्णी हे ज्ञानदेवांचे सर्वात जुने ज्ञात वंशज. हे माध्यंदिन शाखेचे देशस्थ यजुर्वेदी ब्राह्मण यांचे वस्तीस्थान आपेगांव पैठणजवळचे, गोदावरीच्या उत्तरेस असलेले. हरिहरपंतास मुले दोन रामचंद्रपंत व केशवपंत आणि मुलगी एक मोहनाबाई. केशवपंत लहानपणीच वारले. हरिहरपंतानंतर रामचंद्रपंत, रामचंद्रपंतानंतर त्यांचे चिरंजीव गोपाळपंत आणि गोपाळपंतानंतर त्यांचे चिरंजीव त्र्यंबकपंत हे यथाक्रम आपेगांवचे कुलकर्णी झाले. हे त्र्यंबकपंत ज्ञानदेवांचे पणजोबा. नामदेवांनी मुक्ताईच्या समाधीचे अभंग लिहिताना यांच त्र्यंबकपंतांना ज्ञानदेवाचे मुळ पुरुष मानले आहे. "भक्त त्र्यंबकपंत मुळ पुरुष आदि । तयाची समाधी आपेगावी ॥ खुद्द ज्ञानदेवांनी समाधी घेतेवेळी एकशे आठ ओव्यांचे जे स्वात्मपत्र केले त्यातही मुळ पुरुष म्हणून त्र्यंबकपंतांचाच उल्लेख आहे. "आपेग्राम रहिवासु । त्र्यंबकपंत मुळ पुरुषु । मग गोविंदपंते वंशु । विस्तारीला ॥" त्यांचे जेष्ठ पुत्र गोविंदपंत हे कुलकर्णीपणाचे काम पहात होते. त्यांच्या हातून गोरखनाथांची सेवाही घडली. त्यानंतर लवकरच त्यांची इहलोकाची यात्रा संपली. त्र्यंबकपंताच्या आयुष्यातला शेवटचा काळ गोरखनाथांच्या कृपेने परमार्थ साधनेत

गेला. एक श्रेष्ठ भक्त असा लौकीक संपादून त्र्यंबकपंतांनी आपला या लोकीचा प्रवास संपविला. अशा रितीने ज्ञानदेवांचा नाथसंप्रदायाशी असलेला आत्मीयतेचा संबंध त्यांच्या पणजोबांपासून सुरु झाला.

ज्ञानदेवांचे आजी आजोबा गोविंदपंत निराबाई यांनी वृध्दापकाळापर्यंत भोगलेले निपुत्रिकतेचे दुःख गहिनीनाथांच्या प्रसादाने दूर झाले. निराईच्या पोटी विठ्ठलपंतांच्या रुपाने मुर्तीमंत डोळस वैराग्यच जन्मास आले. विठ्ठलपंतांनी आपल्या जीवनाचे तारु सदैव संसारविन्मुखतेच्या दिशेने हाकारले. परिस्थितीच्या प्रतिकुलतेमुळे त्यांना जेव्हा ते संसाराच्या किना-याला आणावे लागले तेव्हा सुध्दा त्यांच्या मनाचे पाखरु निवृत्तीच्या मोकळया वातावरणाच्या ओढीने अस्वस्थ होत राहिले असावे.[५]

विठ्ठलपंतांचा यथाकाळ व्रतबंध झाला. त्यानंतर "केले वेदपठण काव्य आणि व्याकरण । झालासे निपुण शास्त्रवक्ता ।" पुढे विठ्ठलपंतांच्या परमार्थप्रवण मनात तीर्थयात्रेची उर्मी उत्पन्न झाली आणि त्यासाठी आईवडीलांची संमतीही मिळाली. तार्थयात्रा करता करता विठ्ठलपंत आळंदीस आले.

ज्ञानदेवतांच्या लौकिक चरित्रातील अलौकिकपणा जसा डोळयासमोर उभा राहतो त्याचप्रमाणे त्यांच्या माता पितरांच्या चरित्रातील वैशिष्ठयांकडेही आपले लक्ष वेधते. हा 'ज्ञानियांचा राजा' ज्यांच्या पोटी आला त्या आईबापांची कथा खरोखर आश्चर्यकारक आहे. ज्ञानदेवांचा पिता विठ्ठलपंत खरोखर - जिज्ञासु -मुमुक्षू आणि संसार व्यापात पडू नये अशा वृत्तीचा लहानपणापासून प्रवासाची, तिर्थयात्रेची आवड. 'देवाचा शोध' लावण्याची जबरदस्त आकांक्षा हे गुण त्यांच्यात दिसून येतात.

विठ्ठलपंत हे चरित्रनायकाचे पिता. विठ्ठलपंत आई वडिलांचे एकुलते एक अपत्य पण त्यांच्या तिर्थयात्रेना ते फारसे आडवे आलेले नाहीत. विठ्ठलपंतांना लहानपणापासून तिर्थयात्रा करावी अशी तिव्र इच्छा होती. त्याप्रमाणे ते घराबाहेर पडले. त्याकाळी एकदा घराबाहेर पडल्यावर घरी पोहोचण्यास बराच कालावधी लागे. पत्रयेण्याची साधन नसल्यामुळे दूर गेलेल्या माणसाचा समाचार काढण्यास

पुष्कळ वेळ लागे. आपेगांवाहून विठ्ठलपंत पुण्याजवळील आळंदी वेळ लागे. "आळंदी हा गाव । विश्रांतीचा ठाव "सगळया महाराष्ट्राला घेऊन बसला आहे. विठ्ठलपंतांना आळंदीत आपल्या भावी श्वशुरांची गाठ पडली. तेथेच त्यांचा विवाह झाला.

**विवाह:-**

आळंदीला श्रीधरपंत किंवा सिधोपंत म्हणून यजुर्वेदी ब्राह्मण गृहस्थ रहात होते. त्यांची आणि या तरुण यात्रेकरुंची गाठ पडली. सिधोपंतांनी या यात्रेकरुंची चौकशी केली. त्यांना एक कन्या होती. तेव्हाच्या काळाच्या समजुतीप्रमाणे आपली मुलगी उपवर झाली असून तिचे लग्न अजून जमले नव्हते म्हणून सिधोपंत काळजीत होते. सिधोपंत खटपटे, लटपटे नव्हते. चार ठिकाणी जावून मध्यस्थी घालून थापाथापी देवघेव करुन मुलींना ऊजवण्याच्या कलेत ते निष्णात नव्हते.

सिधोपंत विठ्ठलपंतांच्या वागणूकीवर चेह-या मोह-यावर प्रसन्न झाले. स्वत:चे घरदार सोडून एवढया दूर प्रवासाला आलेला हा तरुण आपणास जावई म्हणून मिळेल. विशेषत: घर जावई म्हणून मिळेल तर फार उत्तम होईल. हा विचार साहजिकच त्यांच्या मनात आला. वास्तविक विठ्ठलपंत आपल्या आई-बापांचा एकुलता एक मुलगा संसाराची आवड नाही, परमार्थाची गोडी वाटे म्हणून तिर्थयात्रेला 'देवाच्या शोधाला' बाहेर पडलेला त्याला संसारी बनवण्याची कल्पना सिधोपंतांना झाली. हा एक चमत्कारच म्हणावा, त्यांनी विठ्ठलपंतांना घरी नेवून त्यांचे चांगले आदरातिथ्य केले. त्या दिवशी विठ्ठलपंत त्यांचे पाहुणे झाले. हा आपणास जावई मिळावा ही सिधोपंतांची इच्छा तिव्रतर झाली.

**चमत्कार:-**

त्या रात्री सिधोपंतांच्या स्वप्नात प्रत्यक्ष पंढरीचा विठ्ठल येवून त्यानी आपली कन्या घरी आलेल्या पाहुण्याला सालंकृत अर्पण कर म्हणून त्याला आज्ञा केली. सकाळी उठल्यावर हा चमत्कार त्यांनी विठ्ठलपंतांना सांगितला पण विठ्ठलपंतांनी हा केवळ चमत्कार ऐकून विवाहास तयार व्हावे कसे शक्य आहे? ते म्हणाले, "मला या संबंधी जर विठ्ठलाची आज्ञा होईल तर मग मी या

गोष्टीचा विचार करेन."

खरतर विठ्ठलपंतांची संसारात पडण्याची लग्न करण्याची मुळीच इच्छा नव्हती. तसे असते तर गोविंदपंतांनी आपेगांवातच त्यांचे दोनाचे चार हात केले असते. पण संसार नको म्हणून तर प्रेमळ माता-पित्यांना कष्टी करुन विठ्ठलपंत घराबाहेर पडले.

सिधोपंताप्रमाणे स्वप्नात विठ्ठलाने आपणालाही आज्ञा केली तरच आपण विवाहाला कबुल होवू असे विठ्ठलपंत बोलले. सिधोपंतांनी पाहुण्यांना घरी आणखी एक दिवस राहण्याची विनंती केली. अर्थात मग विठ्ठलपंतांना नाही म्हणता येईना. तथापि हा संसाराचा भार डोक्यावर घ्यावा कि न घ्यावा याबद्दल विठ्ठलांचा दृष्टांत होवूनही त्यांची अनिश्चितता गेली नाही.

विठ्ठलपंतांचा अनिश्चितपणा पाहून सिधोपंतानी त्यांना परोपरीने सांगितले की विवाह झाल्यावर संसाराची तोशीस तुम्हाला लागणार नाही. माझे ते तुमचेच आहे, सिधोपंतांची कन्या एकुलती एक होती त्यामुळे मागेपुढे त्यांचे सर्वच जावयास मिळणार होते. तथापि एक अडचण होती ती हि कि विठ्ठलपंताचे आई-बाप आपेगावी त्यांना कळविल्याशिवाय विवाह विधी कसा उरकावयाचा? पण स्वशुरांनी व्यवहाराच्या गोष्टी सांगून विवाह सोहळा पार पाडला. व काही काळ संसाराच्या अनुषंगाने विठ्ठलपंतांनी घालविला.

पण जुलमाचा रामराम टिकणार किती दिवस? विठ्ठलपंतांची दृष्टी परमार्थाकडे लागलेली "देवाच्या शोधापुढे" त्याना "सुखाच्या शोधांची " पर्वा वाटत नव्हती. अपत्य सुख नसल्याने संसारतही ते रमले नाहीत आणि तिर्थयात्रेचे विचार त्यांच्या मनात पुन:पुन: खेळू लागले. योगसाधना करावी, परमार्थात सर्व काळ घालवावा "अहंब्रह्मास्मी, तत्वमसि" इत्यादी महावाक्यांची प्रतिती घ्यावी अशी आकांक्षा त्यांच्या मनात कल्लोळ करु लागली.

विठ्ठलपंतांनी दक्षिण प्रांतातील यात्रा करुन पुन्हा आळंदीला परत आले. व सिधोपंत, विठ्ठलपंत व रखमाई सर्वचजण आपेगांवला आले. व विठ्ठलपंत सहकुटुंब स्वगृही राहून संसार करु लागले.

कालांतराने त्यांचे आई-वडील मरण पावले. संसारात लक्ष लागेना तेव्हा सिधोपंतांनी त्यांना आळंदीस रहावयास नेले. आळंदीत परमार्थाचा नाद उलट वाढला. आळंदी हे क्षेत्र, क्षेत्रांच्या रस्त्यावर, पंढरपूरला जवळ, परमार्थाच्या हमरस्त्यावरील ठिकाण. पंढरपुरच्या वा-या ते करीत, त्यामुळे संसारात चित्त रममाण होण्याला सहाय्य होण्याचे कारण नव्हते.

**संसार विरक्ती-संन्यास धर्म-मार्गक्रमण :-**

संतती लाभ नाही. माता-पिता नातवंडांचे दर्शन होण्यापुर्वीच परलोकास गेले. सासुसासरे वार्धक्याच्या मार्गात लागलेले खाण्यापिण्याची ददात नसल्याने उदयोग करण्याबाबत आच नव्हती. विठ्ठलपंतांच्या अंत:करणात लहान पणापासून परमार्थाची ज्योत तेवत होती, आता ती चांगली प्रज्वलीत झाली. व संसारात मोक्ष नाही, संन्यास घेतल्याशिवाय जन्म मरणापासून सुटका नाही. असे विचार त्यांच्या मनात अधिक प्रबळतेने घोळू लागले.

आपले मनोगत त्यांनी पत्नीला कळविण्यास सुरुवात केली पत्नीच्या अनुमतीशिवाय संन्यास घेता येत नाही असे शास्त्र आहे. तेव्हा ती अनुमति मिळविण्याच्या उदयोगाला ते लागले. तारुण्याच्या ऐन उमेदित पती संन्यास घ्यावयास निघालेला पाहून त्या बिचारीची स्थिती मोठी चमत्कारीक झाली. पुत्र झाल्याशिवाय पित्रृऋण फेडल्याशिवाय संन्यास घेवू नये असे तिने नम्रतापूर्वक सुचविले. आपल्या मोक्ष प्राप्तीत आड न येण्याबद्दल पत्नीला त्याने परोपरीने विनविले. ती बिचारी माणूसच होती या रोज-रोज चाललेल्या विनवण्यांना, परामार्थाच्या लांब-लांब वर्णनाला एक दिवस ती कंटाळली, एक दिवस रागावून "संन्यास घेण्याचा एवढा हट्ट आहे, माझे काहीही बोलणे मनावर घेत नाही, तर घ्या एकदा संन्यास." म्हणून एक दिवस रागाने, निराशेने ती पतीला बोलली. आणि आश्चर्य विठ्ठलपंतांनी याच शब्दांची अनुमति समजुन घरातून बायकोला टाकून बाहेर पडले.

आपल्या तरुण पत्नीला आपण एवढया दु:खात लोटत आहोत. याचा त्यानी विचारही केला नाही. स्वत:च्या परमार्थापुढे प्रत्यक्ष आपणावर सर्वस्वी

अवलंबून असलेल्या अबलेला आपण जाणून बुजून संकटात ढकलून देत आहोत. हे त्यांना समजले ही नाही. आपल्या हातून अन्याय होतो आहे याचे भान राहिले नाही.

**संन्यास:-**

आळंदीहून उठून त्यांनी काशीचा रस्ता धरला तेथील श्रीपादयति नावाच्या श्रेष्ठसंन्यासाकडे ते गेले. व आपणास संन्यास घ्यावयाचा आहे अशी इच्छा प्रकट केली. "चतुर्थाश्रम देऊन अनुग्रह करावा अशी विनंती केली.

श्रीपादयतींनी सर्व हकीकत विचारली. बायका मुले आहेत का? संसाराची जबाबदारी आहे का? येवढया तरुण वयात इतकी विरक्ति उत्पन्न होण्याची कारणे काय? या सर्व गोष्टीची चौकशी केली. परमार्थाची अतिव लालसा उत्पन्न होवून तो साध्य होण्यासाठी विठ्ठलपंत आपल्या गुरुजवळ खोटे बोलले आपल्याला कोणी नाही म्हणून त्यांनी सांगितले व त्यांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून श्रीपादयतींनी त्यांना संन्यास दिला.

**रुक्मिणीबाईवर वज्राघात:-**

विठ्ठलपंतांनी संन्यास घेतल्याची बातमी बिचा-या रुक्मिणीबाईवर वज्राघात व्हावा तशी येऊन पोहचली. तिचे माता-पिता अगदी वृद्ध झालेले जवळचे दुसरे कोणी नाही. बरोबरचा पति जिवंत असून तिला नाहीसा झालेला. तेव्हा ती बिचारी काय करणार? हिंदु स्त्रीयांच्या परंपरेला अनुसरुन देवदेवतार्चनांत ती काळ घालू लागली. आपल्याला जिवंतपणी मृत्यू आला असे तिला वाटले. तिच्या पोटी येणारी मुले "जीवनमुक्ती"चा महामंत्र मराठी बोलाने जगांत प्रख्यात करतील हे त्यावेळी तिला कसे कळणार? जे जे होईल ते सोसावे एवढेच तिला माहित.

**कर्मधर्म संयोग:-**

योगायोग असा की ज्या श्रीपादयतींनी चतुर्थाश्रमाची दिक्षा विठ्ठलपंतांना दिली तेच दक्षिण प्रांतातील यात्रा करण्यासाठी काशीहून निघाले व फिरत फिरत आळंदी येथे आले. तेथे एके दिवशी सकाळी रुक्मिणीबाई पिंपळाला प्रदक्षिणा घालीत होती व त्या आटोपल्यावर तिला हे यति दिसले. त्यांनी श्रीपादयतींना

नमस्कार केला. ती तरुण सुवासिनी पाहून तिला "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव"असा आशिर्वाद दिला. तो आशिर्वाद ऐकून त्या बिचा-या रुक्मिणीबाईना त्या तशा दुःखदाई स्थितीतही हासू आले. आपल्या पतीने तर संन्यास घेतला आहे हा वृध्द संन्यासी आपणाला पुत्र प्राप्तीचा आशिर्वाद देत आहे हे कसे शक्य आहे? आणि म्हणूनच श्रीपादयतींनी तिला सर्व हकीकत विचारली व तिनेही मोकळया मनाने ती सांगितली.

सर्व हकीकत ऐकून व तिच्या पतीचे वर्णन ऐकून ज्याला आपण काही दिवसापुर्वी काशी येथे आश्रय दिला तो तर या स्त्रीचा पती नसेल ना अशी शंका त्यांच्या मनात आली व त्या दुर्दैवी रुक्मिणीबाईची स्थिती पाहून त्यांचे मन इतके कळवळले की रामेश्वराची यात्रा सोडून ते पुन्हा काशीस गेले.

त्यांनी विठ्ठलपंतांना त्याचे नाव खरेच चैतन्य आहे का? खडसून विचारले व त्यांची शंका खरी ठरली. श्रीपादयति हा असामान्य थोर पुरुष असला पाहिजे यात शंका नाही. तरुण पत्नीचा त्याग करुन तिचा संसाराचा खेळखंडोबाकरुन स्वतःचा परमार्थसाधणे ही गोष्ट त्याना पसंत नव्हती व तसे त्यांनी विठ्ठलपंतांना स्पष्टपणे सांगितले. व संन्यासाचा त्याग करुन परत पत्नीकडे जाण्याची त्याला आज्ञा केली. ती आज्ञा मोठी चमत्कारीक होती. एकदा संन्यास घेतली की तो कायमचा झाला असे शास्त्र आहे. पण मनुष्याच्या परस्पर कल्याणाला शास्त्र जर आडवे येत असेल तर ते टाकावे असा सुधारकी विचार श्रीपादयतींचा होता असे स्पष्ट दिसते. ज्या शास्त्राधारे संन्यासाला आश्रम सोडता येत नाही त्याच शास्त्राआधारे गुरुंची आज्ञा पाळलीच पाहिजे असा नियम आहे. श्रीपादयतींना निराधार रुक्मिणीबाईची ती करुणामूर्ती दिसत होती. तिच्या उध्वस्त झालेल्या संसाराचे चित्र त्यांच्या डोळयासमोर उभे राहिले. विठ्ठलपंतांने खोटे सांगून आपल्याकडून संन्यास घेतला व रुक्मिणीबाईला निराधार करण्याच्या पातकांत आपणाला त्यांने सदिच्छेने का होईना पण वाटेकरी केले. ही गोष्ट त्यांनी लक्षात घेतली व परत जावून संसार कर म्हणून त्यांनी शिष्याला आज्ञा केली व आपली आज्ञा म्हणजे वेदवाक्य आहे असे त्यास बजावले. आणि त्यांनी ती

मान्य करणे भाग पडले. प्रत्यक्ष गुरुने डोळयांत अंजन घातले त्यामुळे त्यांचे काही चालेना. श्रीपादयतींना नितीशास्त्र उत्तम अवगत होते त्यामुळे त्यांनीही अशा प्रकारची आज्ञा केली.

**पुनःश्च संसार प्रवेशः-**

गुरुच्या निर्वाणीच्या आज्ञेमुळे विठ्ठलपंताना काशीवास सोडावा लागला व ते आळंदीला परत आले व त्यांनी संसाराला सुरुवात केली. त्यांच्या वागण्याचा सर्वांना चमत्कार वाटला. समाजाच्या मते त्यांनी संन्यास सोडला हे बरोबर झाले नाही. पण गुरुचे सांगणे विठ्ठलपंतांना पूर्णपणे पटले होते यात शंका नाही. ते पटल्यावर त्यांनी समाजाची पर्वा केली नाही. गृहस्थाश्रमांतून मध्येच पळून जाण्यात आपण आपल्या पत्नीच्या स्थितीचा विचार केला नाही हे त्यांच्या लक्षात आले.

**लोकनिंदेचा माराः-**

विठ्ठलपंत संन्यासाश्रमातून गृहस्थाश्रमात आले. हे समाजाला पटले नाही. लवकरच लोकनिंदेचा मारा सुरु झाला व गावच्या लोकांनी संन्यासी पुन्हा गृहस्थ होवू शकत नाही या शास्त्राधारावर या नवरा-बायकोंना बहिष्कृत केले. समाजाने बहिष्कृत केल्यावर गुरुची आज्ञा पाळण्याच्या कामात विठ्ठलपंतांनी कसूर केली नाही. त्यांना संन्यास ग्रहण करण्यात पूर्वाश्रमातील पत्नीच्या बाबतीत आपले कर्तव्य चुकले याबद्दल त्यांची खात्री पटली म्हणून ते गुरुच्या आज्ञेप्रमाणे संसारात पुन्हा पडले. पत्नीसंबंधी झालेला अन्याय दूर करण्यासाठी त्यांनी अवघ्या जगाची पर्वा केली नाही. लोकांची निंदा सहन केली पण पत्नीचा त्याग केला नाही. शास्त्र लोकांच्या बाजूला होते. माणूसकी विठ्ठलपंतांच्या बाजूला होती.

आळंदीच्या सामान्य लोकांनी विठ्ठलपंत व त्यांची निरपराधी पत्नी त्यांना वाळीत टाकले. सुखाची गोष्ट एवढीच की सास-याच्या सुखवस्तुपणामुळे या बहिष्कृत दांपत्याला खाण्या पिण्याची वस्त्रप्रावर्णाची ददात पडली नाही. लोकनिंदेला न जुमानता वृध्दोसिधोपंतांनी लेकीला व जावयाला सांभाळून महाराष्ट्राच्या भाग्योदयाला मोठे सहाय्य केले.

पुत्रप्राप्ती:-

विठ्ठलपंत संसारांत पुन्हा प्रविष्ठ झाल्यानंतर त्यांनी बारा वर्षे आळंदीत कालक्रमणा केली. व बारा वर्षानंतर एक तप संपल्यावर मुले होण्यास सुरुवात झाली. एकामागून एक अशी चार मुले सहावर्षाच्या अवधित झाली. हा एक योगायोगच म्हणावयाचा. बहिष्कार भोगण्याची बारा वर्षे एक तप तपश्चर्याकेल्यावर त्यांनाही फळप्राप्ती झाली ही गोष्ट आश्चर्यकारक वाटते.

जी असाधारण मुले त्यांना झाली ती तशी मुले खरोखर तपश्चर्येशिवाय, पुण्याईशिवाय होणे दुर्लभ होय. या मुलांच्या जन्म शकांमध्ये बरेच वाद विवाद आहेत परंतु रा.रा.ल.रा. पांगारकर - या विख्यात संतभक्तांनी लिहिलेल्या "मराठी वाड्:मयाचा इतिहास" खंड पहिला - या विस्तृत ग्रंथात पुढील प्रमाणे दिलेली आहेत.[७]

निवृत्तीनाथांचा जन्म :- श्रीमुखनाम संवत्सर माघ वद्य १
शके ११९५ (इ.स.१२७३)

ज्ञानदेवांचा जन्म :- युवानाम संवत्सर श्रावण कृष्ण ८ जन्माष्टमी
शके ११९७ (इ.स.१२७५)

सोपानदेवांचा जन्म :- ईश्वरनाम संवत्सर कार्तिक शुध्द १५
शके ११९९ (इ.स.१२७७)

मुक्ताबाईचा जन्म :- प्रमाथिनाम संवत्सर आश्विन शुध्द १
शके १२०१ (इ.स.१२७९)

या आपत्यांची नावे ही कुतुहल उत्पन्न करणारी आहेत. पंढरपूरच्या एकादशीच्या यात्रेत या चार नावांचा जयघोष पांडुरंगाच्या नावाच्या जयघोषाइतकाच सर्व लोक प्रेमाने करतात. "निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम" ही आरोळी महाराष्ट्राच्या वाड्:मयाचा, महाराष्ट्र धर्माचा, महाराष्ट्र परंपरेचा इतिहास एका ओळीत मंत्रात सांगते वडिलांचे नांव विठ्ठलपंत, आईचे नांव रुक्मिणी मुलांची नांवे अशी पुरेपूर काव्यमय । प्रथम निवृत्ती मग ज्ञान आणि या सोपानाने मुक्तीची प्राप्ती अशी यावर हरीदाशी

कोटीही बसलेली आहे. मुलांनी ज्यांना केवळ देवता स्वरुप मानावे ज्यांच्या तिर्थ रुपत्वाबद्दल कसलीही शंका त्यांच्या मनात कधीही येवू नये असेच माता-पितर या चार आपत्यांना लाभले होते.

**चार मुले विरुध्द जग:-**

तिन्ही देव जैसे परब्रह्मीचे ठसे । जगी सुर्य जैसे प्रकटले ॥
धन्य तो निवृत्ती धन्य तो सोपान । धन्य तो निधान ज्ञानदेव ।
उपजतांज्ञानी हे वर्म जाणुणी । आले लोटांगणी चांगदेव ॥
प्रत्यक्ष पैठणी भटी केला वाद । रेडयामुखी वेद बोलविले
सोहंसुकृताच्या सोडोनिया गाठी । केलीसे मराठी गीतादेवी ॥
नामा म्हणे सर्व सुकृत लाहिजे । एक वेळ जाईजे अलंकापूरा

मराठी भाषा बोलणा-यांचे आज सहाशे वर्षे खरोखर "जगद्गुरु" झालेले ज्ञानदेव यांच्या पितृत्वामुळे "विश्वगुरोगुर:" ही पदवी विठ्ठलपंतांना लाभली आहे यात शंका नाही. त्यासाठी लोकच्छल सोसण्याची तपश्चर्या त्यांनी बारा वर्षे केली होती. विठ्ठलपंतांच्या बहिष्कृत जिवनाचा वृत्तांत बराच काव्यमय प्रकाराने वर्णन केलेला आहे.

"व्दिजी वाळियेले जगी सांडियले । शेखी उपेक्षिले आप्तवर्गी ॥

महाराष्ट्रात विठ्ठलपंतांना बहिष्कृत झाल्यामुळे पुष्कळ त्रास सोसावा लागला पण भजन पुजनात वेळ घालविण्याची सवय असल्यामुळे लोक निंदेची पर्वा न करता दिवस काढले व त्याला रुक्मिणीबाईनी साथ दिली. ज्ञान आणि वैराग्य भक्ती आणि विशुध्द आचरण याच्या जोरावर या जोडप्याने आयुष्य घालविले व मुलांची निगा उत्तम ठेवली. ज्ञानेश्वरीत ज्या ज्या ठिकाणी आईचा वर्णन संदर्भ येतो त्यावेळी ज्ञानदेवांची कोमल भाषा कोवळीकपणाची मुर्तीमंत मुस आहेसे वाटते. "बाप रखमादेवीवर" हे .शब्द ज्ञानदेवांचेच आहेत. यामध्ये त्यांची माता-पितरांबद्दलची निस्सिम प्रेमभावना साठविलेली आहे.

**वृतबंधाचा (मुंजीचा) विचार:-**

मुले हळुहळु वाढू लागली मोठा मुलगा सहा सात वर्षाचा झाल्यावर

त्याच्या व्रतबंधाचा मुंजीचा विचार विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई यांच्या मानात आला. "जन्मना जायते शुद्रः संस्काराव्दिज उच्चते ।" या शास्त्र वचनाला अनुसरुन निवृत्तीनाथाला मुंज झाल्याशिवाय ब्राह्मण म्हणवून घेता आले नसते. आणि या मुंजीच्या प्रश्नामुळेच बहिष्काराचा घोर परिणाम विठ्ठलपंताच्यापुढे उभा राहिला.[१]

संन्याशाची मुले त्यांचे अस्तित्व मान्य करण्यालाही समाज जेव्हा तयार नव्हता तेव्हा तशा मुलाची मुंज करण्याला संमति कोण देणार? आळंदी गावच्या ब्राह्मणांनी तर असली मुंज करण्याचे साफ नाकारले तेव्हा आलेले संकट पार पडावे म्हणून विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई मुलांना घेवून पुरश्चरण करण्यासाठी त्र्यंबकेश्वरला गेले. सहा महिने त्यांनी ब्रह्मगिरीला मुलांसमवेत प्रदक्षिणा घातली. पुरश्चरणामुळे बहिष्कार उठला नाही. पण निवृत्तीनाथांना आपल्या गुरुची प्राप्ती झाली. त्र्यंबकेश्वरी कित्येक महिने पुरश्चरण करुन विठ्ठलपंत सहकुटुंब आळंदीला आहे. निवृत्ती नाथांचा गैनीनाथांचे शिष्य होवून योगमार्गात त्यांचा प्रवेश झाला त्यांना हळुहळु व्यवहारातील गोष्टी समजू लागल्या लहान वयातच व्यवहाराची आंच लागल्याने या भावंडाच्या भावना व विचार शक्ती अल्प वयातच परिणता-अवस्थेला गेली.

आपल्या मुलांच्या मुंजी होणार नाहीत, लग्न होणार नाही या विचाराने विठ्ठलपंत व त्यांची पत्नी तळमळू लागली. व आळंदीच्या ब्राह्मणांकडे त्यांनी प्रायश्चितांची याचना केली. वाटेल ते प्रायश्चित्त मी घेण्यास तयार आहे पण माझ्या मुलांना शुध्द होऊ दया ब्राह्मण होऊ दया अशी त्यांची प्रार्थना होती. पण रुढीने जखडलेल्या ब्राह्माणांनी मान्य करणे शक्य नव्हते त्यांनी विठ्ठलपंतांना सांगितले की, "तुमच्या वर्तनाला प्रायश्चितच नाही व तुमच्या मुलांचे संस्कार व्हावयाचे नाहीत. तुमच्या पुरते तुम्हाला प्रायश्चित म्हणजे देहांत प्रायश्चित." ब्राह्मणांनी सुचविलेल्या देहांत प्रायश्चितांचा मार्ग ग्रहण करण्याचे विठ्ठलपंतानी ठरविले व त्यांचेच अनुकरण करण्याचे रुक्मिणीबाईनी ठरविले. ब्राह्मणांनी बहिष्कृत केलेले आपली शरीर गंगा-यमुनांच्या पवित्र संगमात टाकून सर्व

संसारिक पातकातून मुक्त व्हावे असे विठ्ठलपंतानी ठरविले. दोहांनीही प्रयाग क्षेत्री जाऊन तेथे पुर्वेकडून आलेली जान्हवी आणि पश्चिमेकडून आलेली यमुना यांचा संगम झालेला आहे तेथे देह विसर्जन करण्याचे निश्चित केले आपल्या मधूर बालकांचे प्रेम निश्चयाला आडवे येऊ दिले नाही. ईश्वरभक्तीत मुरलेली त्यांची बुध्दी परमेश्वरावर हवाला ठेवूनच देहांत प्रायश्चित घेण्याला तयार झाली. विठ्ठलपंतांचे जीवन याप्रमाणे शोकपर्यवसायी झाले व त्याची मुले उघडी पडली. आणि निवृत्ती नाथांवर भावंडाची सर्व जबाबदारी आली. गैनीनाथांनी दहा वर्षाच्या मुलाला गुरुपदेश दिला व त्याला योग शिकविला. व आपल्या पंथांत समाविष्ठ करुन घेतले. त्याला योगमार्गत निष्णात केले. पुढे निवृत्तीनाथ हेच आपल्या भावंडाचाही गुरु झाले.

ज्या वयात या भावंडानी खेळावे, बागडावे केवळ आनंदात असावे त्याच वयात खडतर व्यवहाराशी टक्कर देणा-या आपल्या आई-बापांची परिस्थिती त्यांना पहावी लागली. कळावयाला लागल्यापासून या भावंडाना लोकनिंदेचे - बहिष्काराचे खडतर स्वरुप नजरेसमोर होते. पोरकी झालेली मुले आता स्वतःच्या पायावर उभी राहिली. आई-वडील गेल्यानंतर ही मुले आपल्या गावी म्हणजे आपेगांवी गेली. तेथे त्यांच्या भाऊबंधांनी त्यांना मुळीच थारा दिला नाही. तेव्हा त्या अर्भकांना भिक्षा मागून पोट भरण्याचा प्रसंग आला. निवृत्ती व ज्ञानदेव या जोडीने कोरान्न मागण्यास हिंडावे व छोटया मुक्ताला सोपानांनी सांभाळावे असा कम कित्येक दिवस चालला होता. वडीलांचे काहीही पापाचरण झाले असले तरी ही मुले निरपराध आहेत. ही दृष्टि त्यावेळच्या समाजात आलेली नव्हती. ज्या ज्ञानदेवांनी आपल्या अमृतमय वाणीचा वर्षाव करुन महाराष्ट्रीयांना कायमचे समाधान मिळेल असा उपदेश केला, कर्तव्यमार्ग शिकविला, परमार्थ सांगितला, त्यांना कोरान्न मागावे लागले. त्यांना बालपणी कोणीही थारा दिला नाही. आपल्या लहानग्या बहिणीचे संरक्षण त्यांनाच आपापसात करावे लागले. हे चित्र अत्यंत हृद्यद्रावक तर आहेत पण अशा परिस्थितीशी बालवयात झुंजावे लागल्यामुळे निवृत्ती व ज्ञानदेव लवकर शहाणे झाली. ज्ञानदेवांच्या ग्रंथात

व्यवहारज्ञान जे एवढे खच्चून भरले आहे त्याचे कारण या वेळी त्यांना आलेले जगाचे अनुभव हेच होय.

पुढे लवकरच त्यांनी ब्राह्मण मंडळीना आपली मुंज व्हावी अशी प्रार्थना केली. निवृत्तीला अशा गोष्टीची फिकीर वाटत नव्हती पण ज्ञानदेवांचा अवतार वर्णाश्रमधर्माचे रक्षण करण्याकरता झाला असल्यामुळे त्यांनी निवृत्तीचे म्हणणे न ऐकता स्ववर्णात परत जाण्याचा हट्ट धरला. आपण निरपराध आहोत हे पटविण्याचा प्रयत्न ज्ञानदेव व निवृत्तीनाथ यांनी करण्याचे ठरविले.

निवृत्ती, ज्ञानदेव आपल्या दोन लहान भावंडांना घेऊन आळंदीच्या ब्रह्मवृदांकडे गेले व आपल्या मुंजी कराव्यात म्हणून त्यांनी त्यांची प्रार्थना [१०]केली. आळंदीच्या ब्रह्मवृंदांनी त्यांना पैठणच्या ब्रह्मवृंदांकडे पाठविले व तेथे गेल्यावर ज्ञानदेवांनी एक दोन चमत्कारही करुन दाखविले. चमत्कार करवून दाखविल्यामुळे त्यांनी लोकांनी नमस्कार केला पण शुध्दीपत्र दिले नाही. पैठणच्या शास्त्री पंडीतांनी मुलांच्या अर्जाचा विचार केला व संन्याशाच्या मुलांना मुंज करण्याचा अधिकार असल्याबद्दल कोठेहि शास्त्राधार नाही असे आपले स्पष्ट मत दिले.

"नाही प्रायश्चित उभयकुलभ्रष्ट । बोलियेले श्रेष्ठ पूर्वापार ॥
या एक उपाय असे शास्त्रमते । अनन्य भक्तीनें अनुसरावे ॥
तीव्र अनुतापें करावे भजन । गो खर आणि श्वान वंदूनिया ॥

असा निर्णय पैठणकरांनी दिला.

"सर्वाभुती परमेश्वर आहे", "सर्वत्र एकच आत्मा आहे" हा वेदांत, हा भागवत धर्म, तेव्हाच्या पढीत शास्त्रपंडीतांना रचत नव्हता. त्यांची कर्ममार्गावर म्हणजे कर्मठपणावर सर्व भिस्त होती.

पैठणला जाऊन काय निराळा न्याय मिळणार होता? जवळपास तीच तबकडी तेथेही वाजली. शास्त्र ग्रंथांची उलथापालथ झाली, आणि ब्रह्मसभेने आपल्या आदेशाची सुनावणी केली. "तुम्ही संन्याश्याची मुले उभयकुळभ्रष्ट तुमच्या मौजी बंधनाला धर्म शास्त्राची संमती नाही. प्रायश्चित देऊनही तुम्हांस पावन

करुन घेता येत नाही." त्यानंतर शास्त्रमत पाहून ब्राह्मणांनी त्या भावंडांना थोडीसी हितोपदेशाची मात्रा दिली. "या एक उपाय असे शास्त्रमते । अनन्य भक्तीने अनुसरावे ॥ तिव्र अनुतापे करावे भजन । गोखर आणि श्यान वंदोनिया ॥[११] निवृत्ती, मुक्ताबाई हा निर्णय ऐकून आनंदले तुम्ही सांगाल ते मान्य ज्ञानदेव ब्राह्मणांना उद्देशून एवढेच मिळाले.

निर्दय ब्राह्मणांनी मुलांच्या नावाची थट्टा सुरु केली. नावात काय ठेवले आहे? हा पहा पखाल वाहणारा रेडा वाटेने चालला आहे त्यांचे नाव सुध्दा ज्ञानदेव आहे. ज्ञानदेव म्हणाले, "नुसते आमचे नाव एक नाही आमचा आत्माही एकच आहे." ज्ञानदेव जे बोलले त्याचे सत्यत्व त्यांनी ब्राह्मणांच्या प्रत्ययास आणून दिले एका ब्राह्मणाने रेडयाच्या पाठीवर आसुडाचे तडाखे लगावले. त्याचे वळ ज्ञानदेवांच्या पाठीवर उमटले एवढयाने उपहासकांचे समाधान झाले नाही. कोणीतरी ज्ञानदेवांना सुचविले "तुमचा आणि रेडयाचा आत्मा जर एक तर त्या रेडयाकडून वेद वदवा पाहू?" आणि काय आश्यर्य 'बोलरे ऋग्वेद 'असे ज्ञानदेवांनी म्हणताच त्या रेडयाच्या मुखातून वेदांची एकेक ऋचा बाहेर पडू लागली! ब्राह्मण पराभूत झाले, लज्जीत झाले आणि रेडयाने वेद म्हटल्यामुळे अप्रत्यक्षपणे वेदांचीच विटंबना करण्याचे पाप त्याच्या माथी आले.

[१२]"धन्य यांचा वंश धन्य यांचे कुळ । धन्य पुण्याशिल अवतार हे ।
सकळ व्दिजवर करिती नमस्कार । आनंदे जयजयकार गर्जताती ।
चमत्कार पाहून नमस्कार केला पण शुध्दीपत्रे मात्र दिले नाही.

## आणखी एक अलौकिक चमत्कार:-

एका ब्राह्मणाच्या घरी त्यांच्या बापाचे श्राध्द होते. तेथे ज्ञानदेवांनी प्रत्यक्ष पितर भोजनास बोलाविले जयांच्या वचने देव पितर तृप्त ।स्वहा,स्वधा होत ज्यांच्या मुखे ।

पैठणात ही भांवंडे काही दिवस राहिली तेथे त्यांचा काळ अर्थात अध्ययनात व निरुपणात जात असे "सर्वाभुति परमेश्वर" हे तत्व अंत:करणात पुर्ण बाणलेले निवृत्ती ज्ञानदेव गोदेच्या तिरावर बसून लोकोपकराचा मुर्ख लोकांना

शहाणे करण्याचा, संस्कृतमधील ज्ञानभांडार फोडून मराठीत आणण्याचा, लोकांची बोलभाषा ग्रंथभाषा करण्याचा विचार करीत होते. याच गोदातीरावर "अमृताशी पैजा जिंके" असे वाड्:मय निर्माण करुन मराठी मायबोलीला अभिजात भाषांच्या सिंहासनावर बसवण्याची प्रेरणा निवृत्तीने आपला धाकटा भाऊ आणि अद्वितीय शिष्य ज्ञानदेव याला केली.

वरील सर्व चमत्कारांचा तात्काळ परिणाम झाला. ब्राह्मणांच्या आढयतेचा सगळा पीळ नाहीसा झाला. निवृत्ती, ज्ञानेदव, सोपान यांना ते देवाचे अवतार समजू लागले.

[१३]हे परलोकीचे तारु देवत्रय यासी । प्रायश्चित काय यासी कोणे दयावे ॥
लिहोनिया पत्र दिले तया हाती । समस्तासि निवृत्ति नमस्कारीले ॥

नामदेव गाथेमध्ये नामदेवांनी ज्ञानराजांना "योग्यांची माऊली" असे संबोधिले आहे. ते म्हणतात,

"ज्ञानराज माझी योग्यांची माऊली । जेणें निगमवल्लिं प्रकट केली ॥१॥
गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी । ब्रह्मानंदलहरी प्रकट केली ॥२॥
अध्यात्म विद्येचे दाविलेसे रुप.। चैतन्याचा दिप उजळीला ॥३॥
छपन्न भाषेचा केलासे गौरव । भवार्णवी नाव उभारिली ॥४॥
श्रवणाचे मिषे बैसावे येऊनी । सामराज्य भुवनीं सुखी नांदे ॥५॥
नामा म्हणे ग्रंथश्रेष्ठ ज्ञानदेवी । एक तरी ओवी अनुभवावी ॥६॥

## प्रस्तावना:-

नामदेवांबरोबर केलेली तीर्थयात्रा ही यानंतरची ज्ञानदेवांच्या चरित्रातली महत्वाची घटना. या तीर्थयात्रेत ज्ञानदेवांना नामदेवांच्या तोंडून भक्तितत्वरहस्य ऐकावयाला मिळाले.[१४] त्याचबरोबर योगसामार्थ्याप्रमाणेच जातिवंत व उत्कट भक्तीच्या बळावरही चमत्कार घडून येऊ शकतात हे नामदेवांनी ज्ञानदेवांना दाखवून दिले.

या तीर्थावळीचे एकंदर ६१ अभंग आहेत.[१५] आपटे यांच्या सकलसंत-गाथ्यांत (१९६७) ते नामदेवांच्या अभंगात ९१३ पासून ९७३ पर्यत दिले आहेत. वै.प्र.सी. सुबंध यांच्या नामदेवरायांच्या सार्थगाथ्यात (भाग १) ते पृ. २२१पासून ३६८ पर्यत दिले आहेत. यापैकी शेवटचे काशी यात्रेचे तीन अभंग कमसोडून आलेले व भिन्न प्रकारच्या रचनेचे असल्यामुळे कोणीतरी ज्ञानदेव भक्ताने मागून जोडलेले दिसतात ते सोडले तर राहिलेले ५८ अभंग प्रत्येकी कमीतकमी ११ व अधिकाधिक २७ ओळीचे आहेत. एकंदर ओळींची संख्या ८७७ आहे.

नामदेव गाथेमध्ये तीर्थवळीच्या अभंगामध्ये ९०३ पासून ९६४ पर्यत आहेत. यामध्ये त्यांनी केलेल्या तीर्थयात्रेचे रसभरीत वर्णन आलेले आहे.

# तीर्थावळी

ज्ञानोबाचा हात । प्रेमे घरी विश्वनाथ ॥
ऐसें बोलत चालत । दोघे आले गंगेआत ॥
ज्ञानोबाचे पायी । मिठी घाली गँगाबाई ॥
नामा म्हणे सोडा बाई । ज्ञानदेव सर्वा ठायी [१६]॥

"नामदेव तीर्थावळीचे अभंग ॥" ज्ञानेश्वरीच्या रचनेनंतर पंढरपूर येथे यात्रेस गेल्यावर तेथे ज्ञानदेव व नामदेव यांची गाठ पडून दोघांचा उत्तम स्नेह जमला व पूढे दोघांनी मिळून कित्येक महिने तीर्थयात्रेत घालविले. पंढरपूरास ज्ञानदेवांना विठ्ठलाचा परमभक्त नामदेव भेटले. ज्ञानदेव हे ज्ञानेश्वरीचे कर्ते, महासिध्द हे नामदेवाने ऐकिले होते. आणि विठ्ठलरखुमाई बरोबर गुजगोष्टी करणारा, त्यांच्याबरोबर जेवणाखाणारा असा नामदेव देवाचा लाडका भक्त म्हणून ज्ञानदेवांनी ऐकिले होते.

दोघांच्या भेटीचे वर्णन तीर्थावळीच्या अभंगात सुरुवातीलाच नामदेवाने केलेले आहे.

"[१७] नामयाचे भेटी ज्ञानदेव आले । लोटांगण घातले नामदेवे ॥
देऊनी आलिंगन प्रीतीच्या पडिभरें । पूजिले आदरें यथाविधी ॥
धन्य तो अवसरु संतसमागमु । करीतसे संभ्रमु आवडीचा ॥
नामदेव म्हणे सुफळ माझे जिणें । स्वामीच्या दर्शनि धन्य झाले ॥"

नामदेवाना आणि ज्ञानदेवांना परस्परांच्या संगतींत राहून काही तरी शिकावे असे वाटत होते. परंतु ज्ञानदेवांची तीर्थयात्रा करण्याची सुचना नामदेवांना फारशी मानवली नाही. कारण ते म्हणतात.

"सर्वसुख आहे मज पांडुरंगी । जावे कवणालागीं कवणाठाया ॥
ऐहिक परत्र चाड मज नाही सर्वथा ।न लागती पुरुषार्था मुक्ति चारी॥
रंक होवोनिया पंढरी चोहटा । राखनि दारवंटा महाव्दारी ।"

परंतु ज्ञानदेवांचा खरा हेतू नामदेवांसारख्या सर्वश्रेष्ठ भगवद्भक्ताचा सहवास लाभावा हा होता.

"क्षण एक एकांती बैसोनी सहज । अंतरीचे गुज बोलां काही

तुझ्या संगतीचे नित्य सुख घ्यावे । ऐसी ही उत्कंठा बहुत माझे पोटी ।

या ज्ञानदेवांसारख्या थोर पुरुषाच्या उद्‌गारांनी नामदेवांचे मोठेपण सिध्द होते.

तीर्थयात्रा करण्यासाठी विठ्ठलाची अनुज्ञा घ्यावी असे नामदेवांनी सांगितले तेव्हा ज्ञानदेवांनी राऊळात जावून देवाकडूनच नामदेवाला तीर्थयात्रेला जाण्यासाठी अनुज्ञा घेण्याचे ठरविले.

जीवाचा निजभांव सांगे ज्ञानदेव । ऐकोनी पंढरीराव हासिन्नले

म्हणे तूं ज्ञानशिल चिद्रूप केवळ । सभाहय निर्मळ स्फटिक जैसा ॥

तीर्थावळीचे अभंग वाचीत असताना ते नामदेवांनी स्वत: लिहिलेले आहेत का कोणीतरी नामदेव भक्ताने लिहिलेले आहेत. अशी शंका वरचेवर येते. उपरोक्त अभंग केवळ कथनपर आहेत व त्यांत शेवटी "नामा म्हणे" हेही पालुपद नाही. त्यामुळे दुस-या कोणी लेखकाचा हात फिरला असावा.

ज्ञानदेव विठ्ठलाची आज्ञा मागावायास गेले तेंव्हा "सहज तीर्थरुप तुंचि निरंतर" तेंव्हा ज्ञानदेवांचे उत्तर मोठे मार्मिक आहे.

'येरु म्हणे स्वामी बोलिलेती बरवे ।

परि सार्थक करावे या देहाचे ॥

ज्ञानदेव अंतर्यामी, आत्मस्वरुपात तीर्थरुप होते पण देहाला तपश्चर्या घडावी लागते: देहावर संयमनाचा अंमल चालावा लागतो. देहाचे प्रक्षालन व्हावे लागते, देहाला व्यायाम करावा लागतो, वरचेरवर शुध्दी करावी लागते, ही गोष्ट स्पष्ट आहे.

[११]"विठ्ठलांनी नामदेवाला तीर्थयात्रेला जाण्याबद्दल ताबडतोब सांगितले विठ्ठलाला ज्ञानदेवाची "तीर्थरुपता" पटलेली होती व त्याच्या संगतीत नामदेवांचे अर्धवट ज्ञान पूर्ण ज्ञानांत रुपांतर पावेल हे त्याला माहित होते. सगुणोपासना निर्गुणोपासनेची पायरी म्हणून तिचा काही अवलंब करणे आवश्यक आहे. म्हणून विठ्ठल नामदेवाला काय म्हणतात?

[१२]"हांसोनी पंढरीनाथ पाही नाम्याकडे । म्हणे नवल केवढे भाग्य तुझे ॥

प्रत्यक्ष परब्रह्ममूर्ति ज्ञानेश्वर । करीतसे आदर संगतीचा ।

ज्ञानदेवांसारखा ज्ञानी प्रत्यक्ष परब्रह्माचीमूर्ति संगतीचा आदर करीत आहे. तेव्हा नामदेवांनी तीर्थयात्रेला जावे अशीच विठ्ठलाची इच्छा होती. खरे पाहता नामदेव हा विठ्ठलाचा खरा लाडका भक्त. त्याच्याशिवाय प्रत्यक्ष विठ्ठलालाही अत्यंत दुःख होत होते. विठ्ठल म्हणतात.

" [१९]आरुष साबडे नामें माझें वेडें । मार्गी मागे पुढे सांभाळावे ॥
तहानभूक तुवां जाणावी जीवींची । मज चिंता याची वाटे थोर ॥
मग नामयाचा हात धरोनी श्रीपती । देत असे हाती ज्ञानदेवा
रानी वनी जनी विसंबसी क्षणी । घडितो देखोनी आर्त तुझे ॥
चरणी ठेवुनि माथा निघते झाले दोघे । आले चंद्रभागे केली स्नाने
पुंडलिकाचे चरण वंदूनिया नामा । उतरला भीमापैलतीरीं ॥

ज्ञानदेवांसारख्या सतरा आठरा वर्षाच्या मुलाच्या हाती नामदेवासारखा एवढा मोठा करता सवरता माणूस विठ्ठल निरवतो आणि त्याचे वर्णन "माझे आवडते", "आरुष साबडे" असे करतो यावरुन नामदेवाचे विशेष कौतूक करणारे हे अभंग त्यांच्या कोणीतरी भक्तांने लिहलेले आसावेत असे स्पष्ट दिसते.

नामदेवाच्या या आत्मचरित्रपर किंवा ज्ञानदेव चरित्रपर अभंगात विठ्ठल हा चालती बोलती माणसात वावरणारी व्यक्ति आहे.

नामदेवांना घेऊन ज्ञानदेव तीर्थयात्रेला निघाले, पंढरी सोडणे नामदेवांना फार जड वाटले पण ज्ञानदेवांच्या संगतीचा लाभ मिळून तीर्थयात्रा होणार या गोष्टीचा त्याना फार आनंद वाटला.

नामदेव व ज्ञानदेव निघून गेल्यानंतर विठ्ठलाला अत्यंत दुःख झाले. रुक्मिणीने त्यांचे सांत्वन केले. विठ्ठलाच्या दर्शनाला आलेल्या इतर भक्त मंडळींच्या जवळही विठ्ठलाने आपला लाडका भक्त दुरदेशी गेल्याबद्दल खंत व्यक्त केली.

इकडे नामदेव व ज्ञानदेव बोलत बोलत गप्पा गोष्टी करत चालले अर्थात भक्तीचे महात्म्य ज्ञानदेव नामदेवाला विचारी आणि योगाचे व ज्ञानाचे महात्म्य

नामदेव ज्ञानदेवाला विचारी. तीर्थावळीच्या अभंगात योग आणि ज्ञान यांपेक्षा भक्तिसुखाचे, म्हणजे सगुण भक्तीचे महात्म्य वर्णन अतिशय सुंदर आहे..

**ज्ञानदेव - नामदेवांचा संवाद [२०] :-**

तीर्थावळीचा गाभा म्हणजे १० ते १४ अभंगातील नामदेव - ज्ञानदेवांचा संवाद प्रवासात झालेला हा संवाद कै.प्रा. माटे यांनी भिवरेच्या तिरावर झाल्याचे दाखवून 'दोन देवांचे हितगुज' या निबंधात ते म्हणतात.

"एकादशीचा पुण्यदिवस होता. भिवरेच्या तीरावर ज्ञानदेव आणि नामदेव हे दोन देव बसले होते. समोर नदीच्या पाण्याचा खेळ चालला होता. नामदेवांचे मुख करुणामय प्रेमाने स्निग्ध झाले होते. आणि ज्ञानदेवांचे आर्द्र बुध्दिमत्वाने झळकत होते. त्यांची मने आकाशासारखी गंभीर, नदीसारखी प्रवाही आणि झुळकसारखी हळुवार झाली होती. विश्वाचा पसारा पहात दोन गरुडपक्षी उंच डोगराच्या खडकावर बसलेले असावेत. तसे नामदेव आणि ज्ञानदेव हे दिव्य प्रतिभाशाली 'मुमुक्षु' शब्द जोडला तर या दोन प्रतिभाशाली पुरुषांचे हे वर्णन अत्यंत सुंदर आहे.

नामदेवांची मुमुक्षु अवस्था संपून ते ज्ञानी भक्ताच्या भूमिकेवर आरुढ झाले होते. पण ते केवळ भक्त होते आणि ज्ञानदेव ज्ञानी होते.

नाभदेव विठ्ठलाच्या वियोगाने दु:खी झाले व त्यामुळे "फुटोनि ह्रदय दोन्ही भाग झाले" अशी त्यांची स्थिती होऊन "नामा म्हणे आपुले अनाथा सांभाळी । येऊनि ह्रदय कमळी राहे माझ्या" येथून या गैरसमजाला प्रारंभ झाला. ईश्वरभक्त पंढरपूरात होता व तोही नामदेवाच्या ह्रदयात नसून मंदीरात होता. अशी नामदेवांची समजूत होती. त्यानंतर ज्ञानदेव आणि नामदेवांचा झालेला संवाद अत्यंत सुंदर वर्णिलेला आहे.

"ज्ञानदेव म्हणे परियेसी विष्णूदासा । तुं सुख संतोषा पात्र होसी
प्रेमाचा जिव्हाळा तुझ्या ह्रदयी आला । तूं का वेळोवेळी खंती करिसी
विचारी सावध होऊन भक्तराजा । सुखानंद तुझा तुजचि जवळी ॥

ज्ञानदेव हे विष्णुदासा, प्रेमाचा जिव्हाळा तुझ्या ह्रदयात असून तू वेळोवेळी खंत का करतोस? सावध होऊन विचार कर. तुझा सुखानंद तुझ्याजवळच आहे.

नामदेव ज्ञानदेवाना उत्तर देतात.

"मी नेणे ज्ञानगति नेणे योगयुक्ति । न देखें विश्रांति एकेंवीण ॥

सर्वभावे मज तेंचि रुप आवडे । तें पुंडलीकापुढे उभे असे ॥

तो माझा विठ्ठल दावा दृष्टीभरी । आस मी न करी आणिकांची

नामदेव: मी ज्ञान किंवा योग जाणत नाही. एका विठ्ठलवाचून मला विश्रांती नाही. पुंडलिकापूढे जे उभे आहे. 'सर्व भावे मज तेंचि रुप .आवडे' तो माझा विठ्ठल मला दाखवा. मला दुसरी कशाची आस नाही.

ज्ञानदेव अव्दैताच्या मायेचा आणखी एक वळसा देतात -

व्यापक विठ्ठल आहे सर्वदेशी । जरी सांडोनीया पाहसी भेदभ्रम

तो नाही ऐसा ठाव उरलासे कवण । सर्वत्र संपूर्ण गगन जैसे ॥

ज्ञानदेव: भेदभ्रम सोडून पाहशील तर व्यापक विठ्ठल सर्वत्र आहे. आकाशाप्रमाणे तो नाही असे ठिकाणच नाही. आकाशाप्रमाणे तो सगळीकडे आहे. परंतु नामदेवांना पटत नाही.

"काया वाचा मनेमज तोचि व्हावा । गीतीं गावा जीवा सुख वाटे ॥

ऐकावा श्रवणी पहावा तोचि नयनीं । नव जावा जवळोनी दूर कोठें ॥

ज्ञानदेव : अक्षर अव्यक्त देशकाळरहित असे ईश्वरी तत्व आपण आहांत. ज्ञानी लोक सर्व इंद्रियांसह चित्त अंतर्मुख करुन उपासना करतात व अव्दैताचे सुख भोगतात.

'जे अक्षर अव्यक्त देशकाळरहित । ज्ञानी उपासनि सोहंभावे ॥

सर्वेंद्रियासहित आवरोनि चित्त । भोगिती अव्दैत नित्य सुख ॥

परंतु नामदेव म्हणतात माझे सर्व सुख विठ्ठलाच्या पायी आहे. मला दुसरा कोणताही मार्ग नको. माझे मन तेथेंच भक्तीने रंगले आहे. व माझ्या जीवाने डोळे भरुन ते सुख पाहिले आहे.

सर्व सुख मज आहे त्याचे पायी । आणिकांच्या बाही न पडे कदा ॥

तेथे माझे मन रंगलेसे भावे । सुख येणें जीव रेखिलें डोळा ॥

त्यावर ज्ञानदेवांचे म्हणणे:-

सर्वगत संपूर्ण सर्वकाळ असणे । होणे आणि जाणे नाही जया ॥

तें तुजमाझारीं तूं तयाभीतरी । अनुभवीं निर्धारी ठेवोनि मना ॥

ज्ञानदेव: या बाबतीत एकच अडचण की तुला ते सुख केवळ पंढरीतच आणि तेही विठ्ठमूर्तीतच होत असते. आम्ही ज्ञानी तेच विठ्ठलरुप सर्वत्र संपूर्ण, सर्वकाळ असणारे, ज्याला जन्ममरण नाही असे परमात्मस्वरुप समजतो. ते सर्वगत स्वरुप तुझ्यामध्ये आहे व तू त्याच्यामध्ये आहेस. म्हणजे तू स्वत: तत्वरुप आहेस असा त्याचे ठिकाणी मन ठेवून अनुभव घे.

नामदेवपुन: आपले विठ्ठल प्रेम व्यक्त करतात:-

मी न मनीं, न मतीं, लटकी हे कहानी । परि जलधरावाचुनी चातक जैसा ॥

तैसें माझे मन स्मरे रात्रंदिवस । पंढरीनिवास जीवन माझे

नामदेव: हे ज्ञानदेवा तुमचे म्हणणे लटके आहे, खोटे आहे असे म्हणण्यास मी बिलकुल तयार नाही. हे बोलणे लटके नाहीच नाही. पण चातकपक्षी सर्वत्र पाणीच पाणी असूनही मेघाकडेच चोच वासून पाण्याकरिता वाट पाहत असतो. त्याचप्रमाणे माझे मनही अहोरात्र पंढरपूर निवासी विठ्ठलाचेच चिंतन करीत असते "यावर ज्ञानदेव 'तुझा हा एकविध भाव धन्य आहे" असे म्हणाले व 'माझ्या सुखाचा विसावा पंढरीराव माझ्या जीवाला आवडतो' असा हा भाव नामदेवांनी स्पष्ट केला आहे.

अशाप्रकारे सगुण भक्तीने एकांतिक झालेला म्हणून अव्दैत सुखाला अत्यंत पात्र झालेला नामदेव पाहून ज्ञानदेवांना कौतुक वाटले. कारण भक्तीने देवाविषयी जो असा एकजीव झाला तो सगुणाची उपाधि निरस्त झाली की सोहंयावाला आलाच. "शिवोहं शिवोहं" किंवा "विठ्ठलोहं" ही "सोहं" च्या अलीकडची पायरी आहे.

"ऐसे ऐकोनि बोलणे म्हणे ज्ञानदेव । धन्य तुझा भाव एकविध

नामा म्हणे माझ्या सुखाचा विसावा । आवडे गा जीवा पंढरीरावो."

अध्यात्मिक संवाद करीत करीत अशा प्रकारे त्यांचा मार्ग चालला होता. ज्ञानदेव व नामदेव आनंदाने मार्ग कमीत असता "प्रेमे ओसंडत करिती स्वहित गोष्टी । दाविती कसवटी अनुभवाची " प्रेमाने ओसंडून जाऊन आपापले अनुभव एकमेकांच्या कसोटीला लावून आत्महिताच्या गोष्टी करीत होते.[२१] त्यामुळे 'अनिवार सुखवृष्टी होऊन ब्रह्मरसाचा पूर आला होता ' तो तसाच रहावा म्हणून ज्ञानदेवांनी नामदेवांना 'भजनविधि' विचारीला आणि या भजन प्रकारातील नमन, ध्यान, श्रवण, मनन, निदिध्यासन, भक्ती, धृती, विश्रांती या साधनांविषयी अनुभव सांगण्यास "विनवी ज्ञानदेव नामयासी"

"ज्ञानदेव म्हणे परियेसी नामया । अव्दैत आत्मया प्रेममूर्ती ॥
भक्तिभाग्य तुवां जोडिले अविनाश । सांग पा सविलास मार्ग त्याचा
कैसा तो साधावा सांग भजनविधी । कैसी नमनबुध्दि सत्वशील
कैसा निर्विकल्प ध्यानाचा प्रकार । हा सर्व विचार सांगे मज ॥
कैसे ते श्रवण कैसे ते मनन । कैसे निजध्यासन दृढ होय ॥

ज्ञानदेव आपल्याला 'भजनविधि' विचारीत आहेत हे पाहून या नम्रतेची मूर्ती असणा-या भक्तश्रेष्ठाला पराकाष्ठेचा संकोच झाला आणि त्यांनी एकदम त्यांच्या चरणाला मिठी घातली. त्यांचा कंठ सद्‌गदित झाला व ते म्हणाले :-

परि भानूस देखणे करी आन तेज । तैसे ज्ञान माझे स्वामीप्रति
कल्पतरु याचक कृपणाचे व्दारी । दैन्य भाकी थोरी कामधेनु ॥
तैसी तुमची यांचा मज दीनाप्रती । न कळे कालगती समर्थाची
मातेचिया स्नेहे बालक बोबडे । खेळवी लाडे कोडे नेणे लाजो
नामा म्हणे तैसें तुम्ही माझे कौतुक । करुनी सुखें सुख वाढवितां ॥

ज्ञानदेव म्हणतात :-

दृष्टि दुजेपण न ठेवावी । सुखे सुख घ्यावे अनुभवोनी
अनुभवावे आहे ते अवघे ब्रह्मरुप ॥ तुझ्या माझ्यात दुजेपण नाही

तु व मी एकच आहोत. कारण अवघे ब्रह्मरुप एक आहे. सुखाने सुख वाढते "म्हणोनी हा संगु, धरिली थोर आस । झणी होसी उदास भक्तराया" हे सुख

भोगण्याकरिताचा तुझी संगती तीर्थयात्रेच्या निमित्ताने धरली आहे. तेंव्हा संकोच करु नको. ज्ञानदेवांचे हे आपुलकीचे भाषण ऐकून नामदेवांचे मन प्रेमाने भरुन आले. आणि आपल्या अनुभवाची गोष्ट सांगावी असे त्यांना वाटले. कारण अनुभवापुढे कर्म-धर्म वगैरे सर्व पाल्हाळिक गोष्टी सांगणे म्हणजे बुध्दिला व्यर्थ शीण देणे होय.

१) भजन म्हणजे काय याविषयी नामदेवाचा अनुभव महत्वाचा आहे -

सर्वाभुती दया, सर्वभावे करुणा । जेथें मी तुंपणा मावळला ॥

भजन तया नांव वाटे मज गोड । येर ते काबाड वायांवीण .

ज्या भजनात मी - तूं पणा मावळला आहे, मी भक्त व तू देव असे भक्तीपुरतेही व्दैत शिल्लक नाही, भक्ताचे व्यक्तितत्व संपूर्णपणे देवात विलीन झाले आहे अंतःकरणाचे सर्वभाव कारुण्यमय झाले आहेत आणि ईश्वर भूतमात्रात असल्यामुळे सर्व भूतांविषयी दयेचा भाव जागृत झाला आहे त्यालाच भजन म्हणणे मला प्रिय आहे. भजनाच्या नावाखाली केल्या जाणा-या बाकी सर्व गोष्टीं व्यर्थ काबाडकष्ट होत. नामदेवांचे हे भजन उघड उघडजीव ईश्वर आणि भूतमात्र यांच्या अव्दैत ज्ञानावर आधारलेले आहे. अव्दैतात मी - तू हा भेद मावळतो म्हणून या ज्ञानाला दयेची व कारुण्यभावाची जोड मिळाल्यामुळे ही ज्ञानोत्तर भक्ती गोड म्हणजे प्रेममय झाली आहे. हिलाच ज्ञानोत्तर प्रेमभक्ती असे म्हणतात. मी - तू पणाचा अभाव आणि सर्व भूताविषयी दया व करुणा म्हणजेच ईश्वराची भक्ती ही नामदेवांची कल्पना केवढी भव्य आहे.

जीवत्व व्यापक परब्रह्मात मिळून जाऊन व त्यामुळे सर्वभूताशी एकरुप होऊन परमेश्वराची जी पराभक्ती मिळते त्या गीतेतील परा म्हणजे ज्ञानोत्तर भक्तीचेच वर्णन नामदेवांच्या भजनाच्या या व्याख्येत आहे. ज्ञानदेवांनी या भक्तीचे वर्णन पुढील प्रमाणे केले आहे.

तैसा मी एकवांचूनि कांही । तया तयाही सकंट नाही

हे चौथी भक्ति पाही । माझी तो लाहे ॥

एरवी तिजी ना चौथी । हे पहिली ना सरती ।

पै माझिये सहजस्थिती । भक्ति नाव
तैसी किया कीर न साहे । तही अव्दैती भक्ति आहे ।
हे अनुभवाचि जोगें, नव्हे । बोला ऐसें ॥

नामदेवांनीही आपला भजनविषयक अनुभवच वरील व्याख्येत सांगितला आहे. असा भक्त, ईश्वराशी अभिन्न असणारे जे विश्व, ते स्वतः होऊन 'विश्व होऊन संचरे विश्वामाजी' विश्वातील भूतमात्राशी एकरुप झालेला भक्त आपल्याइतकेच भूतमात्रावर प्रेम सहज करीत असतो.

भजनाची ही व्याख्या लक्षात घेतली म्हणजे नामदेवांची भक्ती ज्ञानरहित होती :

२) नमन ते नम्रता न देखे गुण दोष । अंतरी प्रकाश आनंदाचा
येर ते दांथिक जाणावे मायावी । विश्वासाचा मी जीवी न घरी त्यांचा॥

नमन हे आंतरिक नम्रतेचे बाहया प्रतीक आहे. नम्रता नसून केलेले नमन केवळ दांभिकपणा आहे. ढोंग आहे. केवळ शिष्ठाचाराखातर होणा-या या नमनावर नामदेवांचा विश्वास नाही. "जे जे भेटे भूत ते ते भगवंत" मानून त्याला गुणदोष न पाहता भक्तिभावाने नमस्कार करणे हे खरे नमन आहे. नामदेव म्हणतात 'ज्याच्या अंतरी आनंदाचा प्रकाश आहे असा भक्त, गुणदोष न पाहता नम्रतेचे सर्व भूतमात्राला नमन करतो? सर्वव्यापक ईश्वरी तेजाचा सहज प्रकाश आहे या प्रकाशाचा साक्षात्कार होऊन त्याच्याशी एकरुप होऊन राहणे ही अव्दैतभक्ती किंवा ज्ञानोत्तर भक्ती आहे. नामदेव आणि ज्ञानदेव यांचे भजन आणि नमन असे एकरुप आहे.

३) ध्यान तया नाव निर्विकार निकें । जे विश्वी माझ्या देखे विठोबासी

व्यापक विष्णुस्वरुपी विठोबाला सर्व विश्वात पाहणे हेच खरे व निर्विकार ध्यान आहे. ज्ञानदेव ईश्वराला विश्वात्मकच म्हणतात त्याप्रमाणे विश्वव्यापक ईश्वर म्हणजेच विठ्ठल आहे असे नामदेवांनी स्पष्टच म्हटले आहे.

४) असा हा विश्वव्यापक विठ्ठलच विटेवर उभा आहे, त्या विश्वव्यापक ईश्वराचे हा विठ्ठल प्रतीक आहे.अशी वर्णने तल्लीनतेने ऐकणे हेच श्रवण आहे.

५) कृपण मनुष्य ज्या प्रमाणात व्यवसायात लाभ कसा होईल याचे चिंतन करतो त्याप्रमाणे या विश्वव्यापक विठ्ठलाचा श्रवणाने आत्महित म्हणजे आत्मोन्नती अशी होईल. आपण तत्स्वरुप कसे होऊ याचा अखंड विचार म्हणजे मनन.

६) कीटकी जशी भिंगुरटीचे अखंड ध्यान करते त्याप्रमाणे विश्वव्यापक विठ्ठलाचे अखंड अनुसंधान म्हणजे निदिध्यासन.

७) सर्व भावांनी विठ्ठलाचे ध्यान करुन सर्वभूतात त्याचे स्वरुप पाहणे ही भक्ती.

८) प्रारब्धाचे बरेवाईट भोग भोगीत असता, सात्विकता, असंगता आणि विशगिता टळू न देता देहाची स्मृती न होणे ही धृती म्हणजे धैर्य आणि.

९) मन वासनारहित करुन निर्विकल्प अशा गोविंद स्वरुपाचे एकांतात ध्यान करणे ही विश्रांती. अशी नामदेवांनी ज्ञानदेवांच्या प्रश्नांची उत्तरे दिली आहेत.

कायावाचामने हा माझा अनुभव । सांगितला सर्व आवडीचा
नामा म्हणे हेही बोलाविले तेणे । उदार सर्वज्ञें पांडुरंगे ॥

यांप्रमाणे नामदेवाचे हे भक्तिरहस्य कथन आहे व ते ऐकून ज्ञानदेवांनी फार आनंद व्यक्त केला. कोणी कितीही थोर असोत.

परी तुजवीण न मनीं मी विष्णुदासा ।

हे ज्ञानदेवांचे शब्द मोठे समर्पक वाटतात व या भक्तीचे स्वरुप मोठे मोहक वाटते यात शंका नाही. नामदेवांनी विश्वीं विश्वंभर आहे सांगून त्याच्या भक्तीच्या जोडीला 'सर्वाभूती दया, क्षमा व शांती ही त्रयी नेहमी देऊन तोच अर्थ सांगितला आहे. विश्वात्मक सगुण ईश्वराच्या आशा रितीच्या भक्तीने त्यांचे जे मुळातील निर्गुण स्वरुप त्याचे ज्ञान होऊन सविकल्प भक्तीचे निर्विकल्प भक्तीत पर्यवसन होते व भक्ताला शांती किंवा विश्रांती प्राप्त होते.

स्वतः नामदेवांनी नामसंकीर्तन भक्ती ही ज्ञानदीप प्रकाशीत करण्याचे साधन आहे असे सांगितले आहे.

"नाचुं कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावूं जगी ।
सर्व सांडुनि माझाई । वाचे विठ्ठलरखुमाई ।
परेहुनि परते घर । तेथे राहूं निरंतर ।
सर्वांचे जें अधिष्ठान । तोंचि माझे रुप.पूर्ण ॥
अवघी सत्ता आली आंता । नामयाचा खेचर दाता ॥

कीर्तनाचे रंगात नाचत असता जगामध्ये आत्मज्ञानाचा दीप लावू. सर्व ममत्व सोडून आणि वाणीने विठ्ठलरखुमाई म्हणत राहून परावाण्याच्याही पलीकडे असणारे वाणीचा विषय न होणारे जे आपले मुळचे चिन्मय स्वरुप आहे त्या ठिकाणी नेहमी राहू. सर्व विश्वाचे अधिष्ठान असणारा चिन्मय परमात्मा हेच माझे पूर्ण रुप.आहे. त्याची सत्ता व माझी सत्ता यात भेदभाव नाही हे ज्ञान खेचर गुरुकडून नामदेवांना मिळाले व कीर्तनाने हेच अव्दैताचे, विश्वाशी एकरुपत्वाचे ज्ञान देऊन त्याच्या आधारे सर्वाभूती दया, क्षमा, शांती यांचा उपदेश नामदेव करीत.

नामदेवांचे कीर्तनाबद्दलचे मत :-

तीर्थावळीकाराच्या १४ व्या अभंगावरुन नामदेव कीर्तनात काय सांगत असत याची स्वच्छ कल्पना येते.[२२]

"सर्वभूती दया सर्वभावे करुणा । जेथे मी तूं पणा मावळला ।"

याला भजन म्हणतात. मनुष्याने नम्र होणे हेच खरे नमन आहे बाकी सर्व शिष्टाचाराचे ढोंग आहे. 'जे विश्वी देखे माझ्या विठोबासी' तेच खरे ध्यान आहे. नुसते डोळे मिटून बसणे म्हणजे ध्यान नव्हे 'सर्व भावे एक विठ्ठलुंचि ध्याये । सर्वाभूती पाहे रुप.त्याचे ।' हीच प्रेममय भक्ती आहे. गंधफुलांनी मूर्तीपूजा करणे भक्ती नव्हे. अशा रितीचा ईश्वराच्या सर्वव्यापकत्वाचा, सर्वभूतीदयेचा, करुणेचा व नम्रतेचा मी तू पणाचे व्दैत सोडून देण्याचा उपदेश आपल्या कीर्तनात नामदेव करीत. नामदेवांनी कीर्तने करीत सर्व हिंदूस्थानभर संचार केला. त्यांनी आयुष्यभर केलेले समाज प्रबोधनाचे, समाज शुध्दीचे व सामाजिक समतेच्या व प्रेमाच्या प्रसाराचे हे कार्य केवळ अव्दितीय आहे. त्याच्या कीर्तन भक्तीचे यथार्थ स्वरुप

समजल्यावरच त्यांच्या अव्दितीय प्रेमभक्तीची कल्पना येणार आहे. त्यांनी केवळ विठ्ठलमूर्तीच्या भक्तीचा प्रसार केला नाही तर ईश्वराच्या सर्व व्यापकतेचा व सर्वभूतात्मकेचा ज्ञानाचा व ज्ञानासहीत दया, क्षमा शांतीयुक्त भक्तीचा प्रसार केला. हे जाणण्यानेच नामदेव व त्यांचे कार्य याचे असामान्यत्व लक्षात येणार आहे.

कीर्तन म्हणजे सर्वात्मक परमात्माच्या अव्दैत स्वरुपाची चर्चा करुन त्याच्याशी एकरुप होवून आपली सामाजिक कर्तृव्ये, दया, क्षमा, शांतीपूर्वक निष्काम बुध्दिने करुन त्याला अर्पण करणे ही खरी भक्ती आहे. हे सांगण्याचे साधन ईश्वराच्या सर्व व्यापक अशा ख-या स्वरुपाचे व त्याच्या ख-या भक्तीचे प्रतिपादन कीर्तन भक्तीत होत असते हे लक्षात घेतले म्हणजे भक्तीचा, ज्ञानाचा दया, क्षमा शांतीयुक्त कर्तृव्य कर्माचा कसा निकटचा संबंध आहे किंबहूना त्या एकरुप आहेत हे लक्षात येईल. म्हणूनच

भाव तेंची ब्रह्म, ब्रह्मेतेंकचि कर्म । जाणोनिया वर्म म्हणे नामा ॥

ज्ञान, भक्ती व कर्म यांचा समतोल हे महाराष्ट्रातील भागवत धर्माचे वैशिष्ठे आहे.

<u>तीर्थयात्रेतील चमत्कार :-</u>

योग आणि ज्ञान यापेक्षा भक्तीचे महात्म्य अधिक आहे हे दाखविण्याचा हेतू 'तीर्थावळी' चा स्पष्ट होतो. नामदेव आणि ज्ञानदेव रस्त्यावर चालता चालता

तृष्णाकांत वनी होतसे पीडणी । पडले चिंतवणी जीवनालागी ॥
तंव दृष्टि कूप देखिल अवचिता । उदक तेथे पाहता नलगे अंत ॥

नामदेवांना तहान लागली आहे पण पाणीतर कोठेच नाही अशा प्रसंगी

"नामयाप्रति बोले ज्ञानदेवो । मज एक उपायो साध्य असे ॥"
लघिमेचे लाघव करुनि ते अवसरी । उतरुनी भीतरी घेतले जीवन
घेऊनि उदक निघालो बाहेरी । म्हणे अवधारी नामदेव
आणोनि जीवन देऊनि तुझ्या हाती। न दिसेची आन गति आणिक काही
पडिल्या संकटी विचारावे मनी । सांडावी आयणी अभिमानाची

आत्मा तो विठ्ठल सर्व निरंतरी । निरोप दे झडकरी उशीर झाला ।

आत्मा तो विठ्ठल असता सर्व देही । माझी काही नाही चिंता त्यासी

नामा म्हणे धीर करावा नावेक । दावीन कौतुक स्वामीजवळी

आणि म्हणून नामदेवांनी -

'मग लावूनिया नेत्र निर्धार पै केला । ह्रदयी आठविला केशीराज

इष्ठ मित्र बंधु सोयरा जननी जनकु । नेणे मी आणिकु तुजवाचोनी

येई पंढरीराया मजलागी घांवतु । झणी पहासी अंतु कृपाळुवा

अशा प्रकारे नामदेवांनी विठ्ठलाचा धांवा केला द्रौपदी वस्त्रहरण प्रसंगी जसा भगवान श्रीकृष्ण "व्दारकेत गहिवरला" त्याचप्रमाणे तिकडे "वैकुंठपरीत पंढरीनाथ" रुकमाईबरोबर नामदेवाच्याच गोष्टी करीत होता तोही गहिवरला नामदेव आपले स्मरण करीत आहे हे देवाला कळण्यापूर्वी -

आणि माझा डावा कां लवतो लोचन । करितसे स्फुरण वाम बाहू।

उव्देग उपसर्ग वाटताती जिवा । कोणा जीवलगाशी झाले कष्ट

वाजतां पैवारा न लागावा राजसा । माझ्या विष्णुदास भाविकासी

वाटे तहान भूक झाली त्या पीडणी । तरीच माझ्या मनी ऐशी दशा ॥

आणि अशा मनस्थितीत असताना त्याला नामदेवाचा धावा ऐकू आला. त्याचबरोबर काय चमत्कार झाला पहा :-

तवं गडगडीत कूप उदके ओसंडला । कल्पांती खवळला सिंधुजैसा

ज्ञानदेव म्हणे झाले अभिनव । कैसा ऋणी देव केला येणे

सावध करुनिया दिले अलिंगन. । जीवे लिंबलोण उतरिले ॥

तीर्थावळीतील कित्येक अभंग फारच गोड आहेत परंतु त्यातील प्रत्यक्ष नामदेवांचे किती? आणि आणखी कोणा लेखकाने ही यामध्ये आपले कौशल्य दाखविले की काय अशी थोडी शंका येते. ज्ञानदेवांनी यात्रा कोणकोणत्या केल्या याचा निर्णय करणे ही गोष्ट सोपी नाही. तरीही -

पश्चिम प्रभास आदिकरोनी व्दारका । पहिल्या सकळिका प्रांक्षपु-या

पंधी पावन तीर्थे पाहिली सकळिके । प्रक्षाळली पातके वासनेची

हे विधान फारच मोघम आहे. कोणत्याही यात्रेचे विशिष्ठ वर्णन नाही. प्रभास हे क्षेत्र काठेवाडांत साधारपणे पूर्वेच्या बाजूला समुद्र किना-याजवळ (सोमनाथ व वेरावळ बंदर यांपासून फारसे दूर नाही अशा ठिकाणी) व व्दारका काठेवाडाच्या साधारणपणे पश्चिमेस ही दोन नांवे प्रथम दिलेली आहेत व नंतर सर्वमोक्ष पू-या पाहिल्या म्हणून सांगितले आहे. सर्व मोक्षपू-या म्हणजे -

"अयोध्या मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका
पुरी व्दारावती चैव सप्तैते मोक्षदायका "

आणि या क्षेत्रांना जाताना वाटेत लागणारी सर्व क्षेत्रे अशा तीर्थयात्रांना ज्ञानदेव-नामदेवांनी भेटी दिल्या. काशीला ज्ञानदेव गेले होते त्या संबंधी अभंग तीर्थावळीत येतात.

१) ज्ञानदेव आले काशी । विश्वेश्वर आडवे येती
रामनगर वेशीपाशीं । भेटी झाल्या उभयतांसी
परस्परे अलिंगन । नामवंदि उभयचरण

२) पुढे उभे वेशीपाशीं । त्याला लोटांगण काशी
स्वर्गीदेवा जाल्या भेटी । भोंवत्या पातकांच्या थाटी
नामा म्हणे विठ्ठल बोला । ज्ञानोबासी म्हणे चला ॥

तीर्थावळीच्या उरलेल्या अभंगात विठ्ठलाने नामदेवांना परत आल्यावर मोठे जेवण घातले त्याचे वर्णन तीर्थकाराने अत्यंत हृदयंगम केले आहे. परंतु त्याचा संबंध नामदेव चरित्राशी जातो म्हणून त्याची अधिक विचक्षणा करण्याचे येथे कारण नाही.

**प्रस्तावना:-**

ज्ञानदेवांच्या एकंदर चरित्राबाबत आणि त्यांनी घेतलेल्या समाधीबाबत नानाप्रकारच्या शंकाकुशंका व्यक्त केल्या गेल्या. "श्री ज्ञानेश्वरांची समाधि" हा एका भक्तशिरोमणी संताने अनुभवलेला सोहळा आहे. ज्ञानदेवांचे वय व त्यांचा अधिकार, आणि ज्ञानदेवांविषयीचे प्रेम व समाधि घेतल्यामुळे घडलेला त्यांचा वियोग या सर्वामुळे व्याकुळ झालेल्या नामदेवांनी हे क्षण अनुभवले त्याचे निवेदन त्यांनी समाधीच्या अभंगात केले आहे.[२३]

ज्ञानदेवांनी आळंदी येथे समाधि घेतली याविषयी सामान्यपणे कोणाच्याही मनात शंका येणार नाही. या समाधीचा उत्सव दरवर्षी कार्तिक वद्य त्रयोदशीस साजरा होत आलेला आहे.

ज्ञानदेवांच्या समाधीचे एक्काहत्तर अभंग ही नामदेवांची अनुपम भावमनोहर रचना आहे. या अभंगांतून साकार झालेले सारे प्रसंग ही नामदेवांची साक्षात अनुभूती आहे. त्यामुळे अभंगांना लाभलेली प्रत्ययपूर्णता असाधारण आहे. स्वत: कथनकार असलेले नामदेव सर्व प्रसंगात पूरेपूर सहभागी असल्यामुळे त्यांच्या कथनाला आपोआपच अधिकृतता प्राप्त झाली आहे. या सा-या अभंगांचा केंद्रवर्ती विषय एकच आहे - ज्ञानदेव समाधि [२४]

# समाधि

अनुभव हा सागर गुहय आणि ब्रह्म
उघडे अध्यात्म बोलियेले ॥
प्रकट हे गुहय उकलिले गाबाळ
केले करतळमळ ज्ञानयाने ॥
कोणाची कल्पना नुरेची बा येथे ॥
उघडा गुहयार्थ सिध्द केला ॥
करणे न करणे सांगितला पंथ ।
तिन्ही लोकीं कीर्ति वाढविली ॥
ज्ञान हे अंजन साधी संजीवनी ।
नामा म्हणे यांनी ख्याति केली ॥

ज्ञानेश्वरी लिहून झाल्यावर सहा वर्षांनी म्हणजे वयाला एकवीस वर्षे पुरी झाल्यावर दोन तीन महिन्यांनी आळंदी मुक्कांमी ज्ञानदेवांनी समाधि घेतली हा समाधीचा दिवस गुरुवार कार्तिक वद्य १३ शके १२१८ हा होता.

ज्ञानेश्वरीच्या रचनेनंतर ज्ञानदेवांनी तीर्थयात्रा केली आणि त्यानंतर अमृतानुभव हा ग्रंथ लिहिला. त्यांची इतर ग्रंथरचना या दरम्यानच्या कालांतच झाली. ज्ञानदेवानी वयाला एकवीस वर्षे पुरी होण्यापूर्वी दोन उत्तमोत्तम ग्रंथ लिहिले आणि त्यानंतर समाधि घेण्याचे ठरविले. ज्ञानेश्वरीची प्रसिध्दी होऊन तिला असंख्य भक्तजन मिळाले आणि तिची रचना करणा-याबद्दल महाराष्ट्रात अत्यंत आदरबुध्दि निर्माण झाली. त्यानंतर सहा वर्षे तीर्थयात्रेसाठी म्हणा किंवा अन्य कारणाकरितां म्हणा ज्ञानदेव जेथे जेथे वावरले तेथे तेथे त्यांचा महापुरुष म्हणून सन्मान झाला.

या चार भावंडांचे एकमेकांवर पराकाष्ठेचे प्रेम होते. आणि तिघेही भाऊ आपल्या धाकटया बहिणीला-मुक्ताबाईला-जिवाभावापलीकडे जपत. मुक्ताबाईचे वय ज्ञानदेवांनी समाधि घेतली तेव्हां अवघे १७ वर्षांचे होते आणि त्यापुढच्या वर्षात ती आपल्या दोन भावंडांप्रमाणेच इहलोकांतून नाहीशी झाली. तिला या

भावांनी अगदी लहान वयापासून वाढविली, हाताखांदयावर खेळविली, आईबापांच्या जागी ते झाले मुक्ताबाई ही सामान्य मुलगी नव्हती. नामदेवाबरोबर सगुणनिर्गुण भक्तीबद्दल आणि चांगदेवाबरोबर ज्ञानविरहीत योगाबद्दल वादविवाद करण्याइतकी तिला या गहन विषयांची ओळख होती. चारी भावंडे सारख्याच संकटांना भोगून वर आलेली होती. लोकछळाच्या दिव्यातून ते बाहेर पडलेले होते. त्यामुळे जरी यांचे वय लहान होते तरी त्यांना जगाचा, संसाराचा अनुभव फार आलेला होता. लोकछळाने.त्रस्त होऊन आपल्या आईबापानी प्रयाग क्षेत्राला प्रयाण केले व तेथे आपला देह त्रिवेणीच्या उदकांत अर्पण केला. हे दुःख त्यानी भागले होते. बाळपणात लोकछळाचा अनुभव घेतल्यानंतर पुढे आपल्या बुध्दीच्या, विद्येच्या, सव्दर्तनाच्या, प्रभावाने या भावंडांनी आणि ज्ञानदेवाने आपल्या अद्‌भुत ग्रंथरचना सामर्थ्याने जगाला आश्चर्य चकित करुन सोडल्यावर मग सापेक्षतेने त्यांना चांगले दिवस आहे. त्यांची लोकात मान्यता वाढली त्यांच्या चरणावर सहस्त्रावधि लोकांची मस्तके नम्र होवू लागली.

मराठीच्या नगरीत-ज्ञानदेवांने ब्रह्म विदयेचा सुकाळ करुन मराठी भाषेला संस्कृता बरोबरीने सिंहासनाधिष्टित केले. आणि हा सर्व पराकम वयाच्या विशी ओलंडण्याच्या पूर्वी केला. आणि मग केवळ लोकांचे नमस्कार घेण्यासाठी संसारात राहण्यापेक्षा आपले कर्तव्य झाले. लोकांचे ऋण फेडले, हे समजून त्यांनी समाधि घेण्याचा निश्चय केला.

नामदेवाने वर्णन केल्याप्रमाणे एक दिवस ज्ञानदेवाने पंढरपूरात पांडुरंगाला प्रार्थना केली. :-

[२५]"मंगलमुर्ति सुखधामा । भक्तांचिया कल्पद्रुमा
निवृत्तीचीया पुरुषोत्तमा । नमो तुज ॥
विदयासागरा वैरागरा । संकटी माऊली ज्ञानेश्वरा
भरित दाटले अंबरा । तो तूं योगेश्वरा मोक्षदायी
मति चालविली रसाळ । संतश्रोतियां केला सुकाळ
दिधले पुरुषार्थाचे बळ । ते तुं केवळ संजीवन

अमृतानुभव आनंदलहरी । ग्रंथ सिध्दकेला ज्ञानेश्वरी
संस्कृत प्राकृत वैखरी । वदविली माझी ॥
आतां मोक्षाचिया वाटा । पाहिला षटचक्र चोहटा
आज्ञा द्यावी वैकुंठा । ज्ञानदेव म्हणे ॥

योगमार्गाने मोक्षांच्या वाटेवरच्या चव्हाटयावर जाण्याची म्हणजे समाधि घेण्याची इच्छा ज्ञानदेवांनी केली व ही समाधि आळंदीत अलंकापूरात होण्याचा आपला मानस त्यांनी प्रकट केला. संस्कृतमध्ये बंदिस्त झालेली अध्यात्मविदया सामान्यजनांना समजण्यासाठी त्याची मराठीतून चर्चा केली आणि हेच महान कार्य त्यांना जन्माला येऊन करावयाचे होते. कार्य संपल्याबरोबर संसारातून निवृत्त होऊन समाधि सुखात दंग होण्याची हिच ज्ञानेश्वराची वृत्ती आश्चर्य निर्माण करते. आणि त्या वृत्तीतले अमानित्व लक्षात घेऊन आपण कौतुकाने, आदराने ज्ञानदेवाकडे पाहू लागतो. शके १२१८ च्या कार्तिक शुध्द एकादशीला हा समाधीचा निश्चय ज्ञानदेवांनी पंढरीला पांडुरंगासमोर केला असे दिसते. यावरुन त्यांच्या विनयशील व्यक्तिमत्वावर प्रकाश पडतो. ज्ञानदेव समाधि घेणार ही गोष्ट त्याच वेळी पंढरपूरात महायात्रेत जमलेल्या सर्वांना विदित झाली आणि ज्ञानदेवाचे शेवटचे दर्शन घेण्यासाठी पंढरपूरची यात्रा आळंदीकडे वळली. त्यांचे वर्णन करताना नामदेव म्हणतात :-

पंढरीचा पोहा आला अलंकापुरी । पंच कोसावरी साधुजन [२६]
पांडुरंगासंगे वैष्णवांचे भार । दिंडया ते बाहेर निघाल्यासे
पताकांचे भार निघाले बाहेर । भेटती ऋषीश्वर पांडुरंगा
अवघिया भेटी झाल्या त्या बाहेरी । मग अलंकापुरी येते झाले
सोपानाने मग केला नमस्कार । उतरिले पार पांडुरंगा ॥

या मंडळींना सामोरे सोपानदेव आले होते व प्रत्यक्ष पांडुरंग सहकुटुंब या समाधीच्या समारंभासाठी वारक-यांच्या बरोबर आळंदीला आहे. व तेथील इंद्रायणी नदी उतरुन आळंदी गावात गेले नुसते पांडुरंगच नव्हे तर -

हरिहर विधाता आले अलंकापूरी । इंद्रायणीतीरी एकथाटी
योगियांचा सखा कोठे ज्ञानेश्वर । जाती ऋषीश्वर भेटावया
शुन्याचिया पोटीं निरंजन गुंफा । ज्ञानयज्ञ सोपा सिध्द केला
उन्मनी निद्रा लागलीसे फार । स्वरुपी ज्ञानेश्वर जागा झाला
नामा म्हणे देवा भली केली बुध्दी । लागली समाधि ज्ञानदेवां

सर्व मंडळी भेटण्यासाठी आली तेव्हा ज्ञानदेव समाधीसुखात दंग होते त्या समाधीचे वर्णन करतात नामदेव म्हणतात -

[२६]लागली उन्मनी वैराग्याची धुणी । जागा निरंजनी निरंतर
भूचरी, खेचरी, चाचरींच्या छंदे । आगोचरीच्या नादे सहस्त्रदळी
औट हात ध्वनि चित्तवृति जेथे । उजळली ज्योत तन्मयाची
नामा म्हणे देवा करा सावधान । नाही देहभान ज्ञानदेवा

या समाधीतून ज्ञानदेव यथाक्रम बाहेर आले व त्यांनी विठ्ठलाजवळ कायमची समाधि पाहिजे म्हणून प्रार्थना केली आणि तुझा हट्ट पुरविन असे वचनही विठ्ठलाने दिले.

उदित झाले मन आतां काय अनु(न) मान ।
करी शीघ्र प्रस्थान आज्ञा माझी ॥
देवाचा हो कर धरोनी ज्ञानेश्वर । निघाला बाहेर योगीराज
मागे पुढे संत चलिले मिरवित । कौतुक पहात इहलोकी
नारा विठा गोंदा महादा विरक्त । परसा भागवत उभे तेथे
समुदाय वैष्णव मिळालासे भारी । महोत्सव गजरी आरंभिला
नामा म्हणे गुण दाविले श्रीहरी । धन्य अलंकापुरी पुण्यभूमि

थोडक्यात ज्ञानदेवांचा समाधि सोहळा पाहण्यासाठी प्रत्यक्ष विठ्ठल येऊन ज्ञानदेवांच्या पुण्याईनेच त्यांचें सर्वांना दर्शन झाले.

"ज्ञानदेवायोगे सकलांसी दर्शन । परब्रह्म निधान डुल्लतसे"

असे या प्रसंगाचे वर्णन नामदेव करतात. आळंदी हेच ठिकाण पुण्यभूमी असून समाधीला फार योग्य स्थान आहे असेही विठ्ठलाने सागितले.

## समाधीची तयारी :-

समाधीसाठी लागणारे सर्व साहित्य आणले

"तुळशी आणि बेल दर्भ आणि फुले । उदक हे चांगले भागिरथीचे

सर्व वस्तु आणल्या, सर्व साहित्य आणले आणि नंतर साडेतीन पावले निश्चळपणे पुढे टाकल्यावर

"देव म्हणे आता होई सावधान । माग वरदार मज काही ॥"

तेव्हा कार्तिक शुध्द एकादशी जशी पंढरीची तशी कार्तिक वद्य एकादशी आळंदीची व्हावी म्हणून ज्ञानदेवाने मागितले आणि विठ्ठलानेही मोठया आवडीने हे वरदान दिले व "जेथे ज्ञानदेव तेथें मी निशिदिनी" असे सर्वांना सांगितले. आतां ज्ञानदेव आपल्यातून जाणार म्हणून सर्व लोक तर दुःखित झालेच पण प्रत्यक्ष पांडुरंगही गहिवरला आणि म्हणाला :-

[२८]"कोटजाणे माझे जीवीचा कळवळा । प्रेमश्रु डोळा लोटताती
अवघियांचे मन दुःखित तटस्थ । लहान थोर संत ओसंडती
तारियेले जड या माझ्या कीर्तनीं । आठवती मनीं गुण तुझे
नामा म्हणे येथे बोलवेना मज । जातसें निजगुज आवडीचे

नामदेव विठ्ठलाजवळ ज्ञानदेवांच्याबद्दल म्हणतात -

अहंकार पोटीचे उतरीले जहर । केला उपकार जगामाजी
काम क्रोध उतें उतरिले दंभ । करपले कोंभ संशयांचे
विकल्पाचे पायीं हातियेली बेडी । केली ताडातोडी इंद्रियांची
स्वर्गादिक सुखे कमाविली रोकडी । वैकुंठासी शिडी लावियेली
नामा म्हणे धन्य उभारिल्या ध्वजा । घातियेल्या शेजा सुखधांमी

ज्ञानियांचा राजा थोर विभूति चालली म्हणून सर्वत्र तळमळ सुरु झाली:-

कासावीस प्राण मन तळमळी । जैसी कां मासोळी जीवनावीण
दाही दिशा ओस वाटती उदास । करिताती सोस मनामाजी
घातियेली घोण प्राण आला कंठी । ज्ञानदेवांसाठी तळमळी
नामा म्हणे देवा वाटतसे खंती । चालली विभूती योगियांची

नामदेवांचे ज्ञानेश्वरांच्या समाधीचे अभंग करुण रसाने तुडुंब भरलेले आहेत:-

नानापरी मन आवरीतों भारी । कांही केल्या हरि विसर न पडे
दृश्या अदृश्याच्या दूर केल्या गोष्टी । उघडिली दृष्टी ज्ञानदेवे
गीतेवरी टीका ग्रंथ केला सार । केवळ ईश्वर ज्ञानाचा हा ॥
नामा म्हणे आतां देहासी विटला । स्वरुपी पालटला ज्ञानदेव

ज्ञानेश्वर हे प्रत्यक्ष ईश्वराचे मुर्तीमंत रुप होते देह संपूर्णात विलिन करुन आत्मा स्वरुपात विलिन केला. दशमीच्या दिवशी बाहेर पडून एकादशीच्या दिवशी हरिजागर करावा आणि व्दादशीला पारणे सोडून त्रयोदशीला समाधि घ्यावी असे ठरले. आणि मग ज्ञानदेवाने पांडुरंगाकडे आपली भावंडे निरविली. त्या प्रसंगाचे ह्रदयद्रावक वर्णन नामदेवाने केले आहे.

निवृत्ति सोपान मुक्ताई धाकुटी ।धरियेली कंठी पांडुरंगे
कळवळली मनीं करिती दीर्घ ध्वनि । आठविली मनी ज्ञानदेव
विकळ झाले चित्त संदेह दुश्चित । नामा विकळ तेथं होत असे

प्रत्यक्ष पांडुरंगाने या तीन भावंडांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. ज्ञानदेवाने

"पापी उध्दरीले । पतित तारिले । जड पाठविले मोक्षपंती

इतकेच नव्हे तर याहूनही अनेक विशेष गोष्टी केल्या,

निसंगासी संग नलगे आणिकांचा । परमार्थ हा साचा गहन केला
जड या जीवांचे हरविले अज्ञान । नेले उतरुन भवसिंधु
ज्ञानियासी केली सिंधुसंजवीनी । झाले जनी वनी एक तारु
नामा म्हणे सत्यबा माझ्याचे बोलणे । करी लिंबलोण पदी त्याचे

जमलेली सर्व ज्ञानी माणसे होती ती ज्ञानी असली तरी माणसेच होती. या सर्वांना ज्ञानदेवांच्या देहरुपी वियोगाची कल्पना असहय झाली.

ज्ञानदेवांचे गुण, त्याने केलेले चमत्कार या सर्वांची आठवण त्यांना झाली आणि ती भावंडे स्फुंदू लागली विठ्ठलांने त्यांचे परोपरीने समाधान केले खद्द ज्ञानदेवांनी प्रकट केलेल्या ज्ञानाची आठवण करुन दिली. "स्वये नंदादीप उजळिला", त्याची आठवण त्यांनी करुन दिली आणि समाधीच्या आड येऊ नका

असे त्यांना विनविले. आणि पुढच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली-

आणिक वाद्यें तेथे वाजताती अपार । उठावले भार वैष्णवांचे
चिद्रत्न मंडप दिधला कल्लोळ । जैसे दीपमाळ दीप ठेले
नक्षत्र गोंधळ उसळती भारी । चक्रे त्याजवरी उल्लाळती
मोतिये तोरणे लावली अपार । झळकती तारे विपु ऐसें
नामा म्हणे देवा नवल केले गहन । पुंजाविले गगन ज्ञानदेवे
निवृत्तिज्ञानदेव उभे दोहींकडे । सोपान ते पुढें मुक्ताबाई
देहुडे सुरगण थक्क पडिले लोका । सुरु केला डंका वैकुंठिचा
चक्रतीर्थी उभे देव साधुजन ।. करविले स्नान ज्ञानदेवा

आणि मग ज्ञानेश्वरांनी सर्व देवांचे तिर्थ घेतले व सर्वांना नमस्कार केला आणि विठ्ठल-रुक्मिणी, ऋषी इत्यादीनी ज्ञानेश्वराची पूजा केली. नामदेवांनीही गंध अक्षता वाहून ज्ञानदेवांची पूजा केली.

टाळ विणे मृदंग वाजती अपार । नारद तुंबर गीत गाती
शुक नामदेव अंबऋषी सादर । मध्ये ज्ञानेश्वर ब्रह्मरुप
पिंपीलिकेसी मार्ग जावया न मिळे । जातीभार मेळे वैष्णवांचे
नामा म्हणे देवा दाविली नवाळी । पुरविली आळी ज्ञानोबाची
दशमीचे दिवशी केली प्रदक्षिणा । आणिक कीर्तना संत उभे
रात्रंदिवस त्यांही केला हरिजागर । हरिदिनी थोर कृष्णापक्षी
मग केले स्नान भागीरथीचे तीरी । संतमहंता भारी पुजियेले
अवलोकिले डोळा आंतर बाहेरी । मग सिध्देश्वरी येथे झाले
सिध्देश्वरालागी पूजीले निवळ । मागीतले स्थळ समाधीसी
गंगा आणि गिरिजा नीळकंठ ईश्वर । केला नमस्कार नामा म्हणे

सिध्देश्वराजवळ समाधि घेण्याचे निश्चित झाले होते तेथे मंडळी येऊन पोहोचली. समाधीची जागा झाडून साफसुफ करुन घेतली. व्दादशीला पारण्याचा मोठा समारंभ झाला.

गंगा गिरजा राही रुक्माबाई भामा । उठिल्या रांधण्या पारण्याच्या, सगळया पंक्ति पिंपळाच्या पानावर बरविल्या "पात्रे ते श्रीपति वाढूं लागे", नुसते वाढूं लागले नाही तर

"सोवळयाने हरि वाढितो सकळां । मनींचा कळवळा कोण जाणे
रुक्माईच्या कानी सांगितली गोष्ट । विस्तारावे ताट ज्ञानदेवा
राई रुक्माबाई वाढिती आवडीने । सोडितो पारणे ज्ञानदेव
नामा म्हणे देवा परब्रह्म अन्न । जातो बोलावणे ज्ञानदेवा
निवृत्ति मुक्ताईचे करिती समाधान । घेतला सोपान मध्यभागी
ऐक्य आहिक्याची बैसली एकवटे । विस्तारिली ताटे रुक्माईने
एक एकालागी देताती प्रसाद । आतां ज्ञानराज पाहूं डोळा
नामां म्हणे स्वरुप जेवितां पंगती । घृतपात्र हाती विस्तारितु

ऐक्याप्रत पावलेले ज्ञानेश्वर आणि अहिंक्यात असलेले इतर यांची एक पंक्ति झाली. मग ज्ञानदेवाला चंदनाची उटी लावून अक्षता लावल्या व पुष्पमाळा त्यांच्या गळयात घातल्या. दोन प्रहरी भोजन आटोपल्यावर तीस-या प्रहरी कीर्तनाला सुरुवात झाली आणि मग प्रत्येक जण समाधीपुर्वी ज्ञानदेवांच्या भेटीस निघाले. ज्ञानदेवांनी समाधीच्या जागेची पूजा केली. ते त्या प्रसंगी पुर्ण आनंदात होते. निमग्न होते. देहभावाचा पूर्ण विसर पडलेला होता. ते आता फक्त समाधि सुखाचिच वाट पाहत होते. ज्ञानेश्वर माऊलीने आपल्या भावंडांचे हात विठ्ठलांच्या हाती दिले तेंव्हा प्रत्यक्ष ईश्वरमुर्ती गहिवरली.

एकंदर समाधि प्रसंगात पांडुरंगाची भूमिका कर्त्या पुरुषाची आहे समाधीसाठी जमलेला सर्व संतमेळा येथे नावानिशी नोंदविला आहे. या अभुतपूर्वक प्रसंगाचे गांभीर्य व असाधारणत्व उपस्थितांमुळे अधोरेखित होते.

निवृत्तीनाथ मुक्ताबाईची समजूत काढताहेत. सोपानास त्यांनी जवळ घेतले आहे आणि रुक्मिणी सर्वांना वाढते आहे. प्रसादाचे जेवण करीत असताना स्वतःदेव पांडुरंग तुप वाढतोय.

"नामा म्हणे स्वस्थ जेवितां पंगती । घृतपात्र हाती विस्तारितु"

खंतावलेली मने वातावरणातील औदासीन्याची तिव्रता विशेषत्वाने जाणवून देत आहेत. हाती तुपाचे भांडे घेऊन वाढणारा पांडुरंग जेवायला बसलेल्या पंगतीचे वैभव वाढवितो आहे.

"ज्ञानदेवालागी चंदनाची उटी । पंचारती होती आनंदाच्या
गंध आणि अक्षता पुष्पपरिमळा । घेती वोसंगळा नामदेव
ज्ञानदेव स्वस्थ देव वोसंगळा । माळा घाली गळा नामदेव

ज्ञानदेवांना चंदनाची उटी लावून त्यांना आनंदाने पंचारती ओवाळताहेत, गंध व अक्षता लावताहेत, फुले वाहताहेत, नामदेव मांडी घालून बसलेत. ज्ञानदेव स्वस्थ बसलेत, पांडुरंगही मांडी घालून बसलेत. नामदेवांनी या दोघांनाही फुलांच्या माळा घातल्या.

स्वस्थपणे व पोटभर जेवून सर्वजण उठले दुपारपर्यंत भोजन आटोपले.तृतीय प्रहरी कीर्तनाला आरंभ झाला. कीर्तनात देव रंगले आहेत. नामदेवांचा सारा जीव ज्ञानदेवांत गुंतलेला असल्याने त्यांनी समाधीला उशीर होतोय याची आठवण करुन दिली.

ज्ञानदेव समाधीस्थानी प्रवेश करण्यापूर्वी सर्व मंडळी त्यांना अखेरचे भेटताहेत. आता पुन्हा त्यांची भेट घडणार नाही एवढा एकच विचार प्रत्येकाच्या मनात असावा.

ब्रह्मदेव, चिद्रत्नांचे आसन, उन्मनीची धुनी असे वातावरणातील विशेष सांगुन समाधि प्रसंगाची उदात्तता नामदेवांनी चांगलीच वाढवली आहे. धूतवस्त्र, तुलशी - बेल, दुर्वा-दर्भ फुले यांसारख्या निर्देशांनी वातावरणातील पाविञ्यात भर पडते. आणि 'निरंतर छाये' च्या अखेरच्या उल्लेखाने तर समाधीचा सर्वसामान्यांना कायम वाटणारा आधार सुस्पष्ट झाला आहे.

ज्ञानदेवांच्या व्यक्तित्वाचा व कर्तृत्वाचा प्रभाव इतर अनेक गोष्टींप्रमाणे समाधीच्या रुपानेही कायम राहिला.

"लावियेला दीप निरंजम ज्योती । प्रकाशल्या दीप्ती तन्मयाच्या
पूजूनि समाधि निघाले बाहेर । प्रेमे ज्ञानेश्वर डुल्लतसे"

अंधार दूर सारणारा दीप लावला. तन्मयाचे तेज पसरले. समाधीची पूजा करुन सारे समाधीबाहेर आले. ज्ञानेश्वर आनंदात निमग्न आहेत डोलताहेत. आणि उरलेले सारे वियोगकल्पनेने शोकमग्न आहेत. हा विरोध ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकतो. ज्ञानदेवांची दिव्यभव्यता, त्यांनी सर्वाठायी उत्पन्न केलेले आपलेपण आणि त्यांच्या विरह कल्पनेतून निष्पन्न होणारे पोरकेपण ही ज्ञानदेवाच्या किमयेची पावती म्हणावी लागेल.

निवृत्ती, सोपान, मुक्ताबाई हे देवाला म्हणाले आम्हाला काही स्वत:चे हितगुज सांगा. असा हा सोपानदेवांनी घराला देवा, तू सर्व सज्जनांचे विश्रांतीस्थान आहेस असे देवाचे लक्षण ज्ञानदेवांनी सांगितले. सोपानाचे हात देवाच्या हातात असताना ज्ञानदेव व्याकूळ झाले. सागरासारख्या विशाल सद्‌गुरु निवृत्तीनाथांचे अंत:करण ज्ञानाने परिपुर्ण भरलेले आहे. समाधीचा क्षण जसजसा जवळ येत चालला तस तसा प्रत्येक जण विमनस्क होवू लागला.

पांडुरंग आणि निवृत्तीनाथ दोघे उभे होत. ज्ञानदेवांनी नमनाला आरंभ केला. नामदेव व पुंडलिक हे दोघे दोन बाजूला उभे आणि पुढे ज्ञानदेव, गंध अक्षता, सुगंधी फुले आणि भागिरथीचे पाणी आणले. ज्ञानदेवांची नमनाला सुरुवात केली.

पुढे ज्ञानेश्वर जोडोनिया कर ।बोलतो उत्तर स्वामीसंगे
पाळीले, पोसिले चालविला लळा । बा माझ्या कृपाला निवृत्ती राजा
स्वामीचिया योगे जालो स्वरुपाकार । उतरलो पार मायानदी
निवृत्तीने हात उतरिला वदना । त्यागिले निधाना आम्हालागी
नामा म्हणे देवा देखवेना मज । ब्रह्मी ज्ञानराज मेळविला

निवृत्तीनाथांपुढे हात जोडून ज्ञानेश्वर म्हणू लागले हे कृपावंत निवृत्ती राजा, तुम्ही माझे पालनपोषण केले, माझे लाड पुरविले, तुमच्याच मुळे मला आत्मज्ञान झाले. मी मायानदीतून पार झालो निवृत्तीने (ज्ञानेश्वरांच्या) चेह-यावरुन हात फिरवीला म्हणाले, लीन होण्यासाठी तो दूर जातोय. ब्रह्मस्वरुप झालेली ज्ञानेश्वरांची स्थिती पाहणे नामदेवांना मात्र वियोगकल्पनेमुळे असहय झाले.

ज्ञानदेवांनी येथे गुरुकृपेचा स्पष्ट निर्देश केला आहे. गुरुकृपेमुळेच स्वरुपाकार झालो हे म्हणण्यात ज्ञानदेवांची विनम्रता आणि निवृत्तीनाथांची थोरवी दोन्ही स्पष्ट होतात. ब्रह्मलिन ज्ञानदेव आता आपल्याला सोडून जाणार, त्याचा व आपला कायमचा वियोग घडणार ही भावना त्यांना यातनामय वाटते.

वोसोडोनि निवृत्ती आलिंगो लागला । आणिकांच्या डोळा अश्रु येती
अमर्यादा कधी केली नाही येणे । शिष्य गुरुपण सिध्दी नेले
गीतार्थाचा अवघा घेतला सोहळा । गुहयगौप्यमाळा लेवविल्या
फेडिली डोळयांची अत्यंत पारणी । आता ऐसे कोणी सखे नाही
काढोनिया गुहय वेद केले फोल । आठवती बोल मना माझी
नामा म्हणे संत कासाविस सारे । लाविती पदर डोळी यासी

प्रेमाने उचंबळून येऊन निवृत्तीनाथ ज्ञानदेवांना अलिंगन देऊ लागले हे पाहून इतर सर्वाच्या डोळयात अश्रु उभे राहिले.

याने (ज्ञानदेवाने) कधीच माझी अवज्ञा केली नाही. गुरुशिष्य हे नाते शेवटपर्यत चांगले सांभाळले. गितार्थाचे सारे रहस्य सुस्पष्ट केले. गहनस्थळे उत्तम प्रकारे उलघडली. ज्ञानदेवांनी डोळयांचे पारणे फेडले. आता असा सखा मिळणे नाही. गितार्थ सुस्पष्ट करुन वेद निरर्थक ठरविणारे (ज्ञानदेवांचे) शब्द मनातल्या मनात सारखे आठवत राहतात. नामदेव म्हणतात, सगळे संत कासाविस झाले आणि त्यांच्या डोळयातून अश्रु वाहू लागले.

"आता ऐसे कोणी सखे नाही" हा निवृत्तीनाथांचा अभिप्राय ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्वाची उंची प्रकट करतो. ज्ञानदेवांच्या कार्याचा गौरव आणि त्यांच्या वियोगाचे दुःख अतिशय साध्या परंतु भावसंपन्न शब्दात साकार झाले आहे. साध्या शब्दातील ही भावाभी व्यक्ति कमालिची उत्कट आहे. या अभंगातील प्रत्येक शब्द भावनेचे वजन घेवून आला आहे. ज्ञानदेवांची योग्यता, त्यांच्या चिरविरहाच्या कल्पनेने आलेली व्याकुळता आणि सा-या उपस्थितांची कातर अंतःकरणे या अभंगात मुर्त होताहेत.

देव म्हणतात असे किती किती आठवाल समाधीला उशीर होईल प्रकाश

दाखविणारी ही समाधि सदैव तुमच्या जवळच आहे. देवाने निवृत्तीला पोटाशीधरले सर्वाचे सांत्वन केले. लहानग्या परंतु अधिकारी मुक्ताबाईची जबाबदारी ज्ञानदेवांनी पांडुरंगावर सोपवली आहे. तसेच सोपानाची समजूत काढण्याची जबाबदारीही सोपवली आणि विठ्ठलही त्यांना इतरांच्या ही कल्याणाचे आश्वासन कर्तव्य भावनेने देतो. ज्ञानोबांच्या शब्दाचा देवाने मान राखणे यात ज्ञानोबांचेस्थान केवढे मोठे होते ते लगेच समजते.

चारही भावंडे एक होती हे मनावर ठसते. त्यासाठी त्रिवेणी ब्रह्मा-विष्णु-महेश, त्रिगुण मुद्रा इत्यादींची उदाहरणे घेतली आहेत. चौघांचे एकक ज्ञानदेवांच्या समाधीमुळे मोडले. त्यानंतर ते एका पाठोपाठ एक समाधीस्थ झाले. ज्ञानेश्वरांनी पहिल्यांदा वैकुंठाची वाट धरली ती आळंदीला. सोपानासाठी इंद्रनील पर्वत, निवृत्तीसाठी त्र्यंबकेश्वर तर चौथ्या मुक्ताबाईसाठी तापी नदिचे पवित्र तिर्थ निश्चित आहे हे सर्व त्या त्या ठिकाणी समाधि घेऊन प्रसिध्दीस पावली.

निवृत्ति देव म्हणे करितां समाधान । कांही केल्या मन राहात नाही
बांधल्या तळयाचा फुटलसे पाट ।ओघ बारा वाट मुरडताती
बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा । तृण रानोमाळा पांगलेसे
हरिणीविण खोपी पडियेली वोस । दशदिशा पाडसे भ्रमताती
मायबापें आम्हां त्यागियेलें जेंव्हा । ऐसें संकट तेंव्हा जाले नाही .
नामा म्हणे देवा पेटला हुताशन । करा समाधान निवृत्तीचे

ज्ञानदेवांच्या समाधीमुळे निवृत्तिनाथ, सोपान आणि मुक्ताबाई ही भावंडे भावनिक दृष्टया कोलमडल्यासारखी झाली. त्यांच्यावर ज्ञानदेवांच्या चिरवियोगाचा आघातच झाला. निवृत्तिनाथांसारखा योगी पुरुषही आपले दुःख आवरु शकला नाही. त्यांच्या भवनेचा आवेग इतका तीव्र आहे की, त्यांची समजूत काढणे म्हणजे पेटलेला हुताशन विझवणे, अशी शब्दयोजना नामदेवांना करावीशी वाटली. विठ्ठलपंत व रुक्मिणीबाई यांनी प्रयागतीर्थी देहत्याग करण्यासाठी जेंव्हा मुलांना सोडले तेंव्हा तर मुले लहान होती. पण तेंव्हाही त्यांना जे पोरकेपण जाणवले नाही ते आता वयाने मोठे झाल्यावर ज्ञानदेवांच्या समाधीमुळे जाणवते.

निवृत्तिनाथांची समजूत घालणे खरोखर किती अवघड! स्वतःच जे ज्ञानी व योगी, यांच्यासाठी नामदेवांनी योजलेली "विभूती" हे विशेषण अगदी समर्पक आहे.

सर्व वारकरी मंडळी स्वस्थ चित्ताने समाधीच्या भोवती बसली. ज्ञानेश्वर जेंव्हा समधीस तयार झाले तेंव्हा पातकांची दांटी खूप वाढली. अत्यंत आरोग्यदायी अजानुवृक्षाची फांदी समाधीसमोर रोवली. त्या वाळक्या फांदीस पालवी फुटलेली पाहून सर्वांनी तिला नमस्कार केला. तर दुसरीकडे घार उडून जाताच तिच्या पिलांची तिरपीट उडून गेली. हा अनुभव व्दंव्दात्मक आहे. सुखदुःखातीत गेलेल्या ज्ञानदेवांनी मागे राहिलेल्यांना विरहदुःखाचा विदारक अनुभव मागे ठेवला आहे.

मुंग्यांच्या वारुळाला आग लागली असा प्रकार पूर्वी कधी झाला नाही, पुढे कधी होणार नाही. राही, रुक्माई व सत्यभामा प्रेमाने ज्ञानेश्वराला ओवळताहेत. गुढया तोरणे उभारलीत सुदर्शनचक्रांची छाया धरली आहे. नारा, विठा, गोंदा व म्हादा हे भेटले. विसोबा खेचर, चांगा वटेश्वर, सर्वांनीच नमस्कार केला. गोरा कुंभार, सावता माळी, नामदेव वासरासारखे तळमताहेत. या सर्वांचे प्राण कंठाशी आले आहेत. लौकिकाचे सारे बंध ओलांडून चाललेल्या ज्ञानदेवांमुळे लौकिक पातळीवर भावनिक हळकल्लोळ उत्पन्न झाला आहे हे ज्ञानदेवांच्या श्रेष्ठत्वाचे प्रत्यंतर म्हणता येईल.

अखेरचे नमस्कार चालू असतानाच खुद्द पंढरीरायाने ज्ञानदेवांचा त्यांनी केलेल्या कार्याबद्दल गौरव केला आहे. जगाने यांना छळले तरी जगासाठी यांनी आपले आयुष्य वाहिले, बुडत्या जनांना वाचवण्यासाठी विश्व मोहरे लावण्यासाठी ज्ञानदेवांनी अपरंपार धडपड केली, ज्ञानेश्वरी-अमृतानुभवासारखे ग्रंथ रचून लोकांना सन्मार्गाचा बोध घडविला. ज्ञानदेवांच्या कार्याची पावती देवाने दयावी यातच सारे काही आले.

देव निवृत्ति यांनी धरियले दोन्हीकर । जातो ज्ञानेश्वर समाधीसी.

नदीचिया माशा घातले मानवण । तैसे जनवन कालवले

दाहिदिशा धुंद उदयास्तवाविण । तैसे चि गगन कालवले

जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी । पुढे ज्ञानेश्वरी ठेवियली

ज्ञानदेव म्हणे सुखी केले देवा । पादपद्‌मी ठेवा निरंतर

तीन वेळा जेंव्हा जोडिले करकमळ । झांकियेले डोळे ज्ञानदेवें

भीममुद्रा डोळा निरंजनी लीन । जाले ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव

नामा म्हणे आता लोपला दिनकर । बाप ज्ञानेश्वर समाधीस्त

ज्ञानदेवांच्या साक्षात समाधीचा क्षण या अभंगात साकार झाला आहे. ज्ञानदेव आसनस्थ झाल्यावर त्यांनी पुढे ज्ञानेश्वरी ठेवली हा उल्लेख वारकरी पंथाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. आणि नंतर त्यांनी समाधि घेतली. ज्ञानदेव, समाधि घेण्यासाठी पांडुरंग आणि निवृत्तिनाथांबरोबर आत चालले तेंव्हा सा-यांची अंत:करणे हेलावून गेली. अशी नोंद नामदेव करतात. पुढे समाधि घेतल्यावर त्यांची प्रतिक्रिया "लोपला दिनकर" सुर्यच अस्ताला गेला अशी झाली अस्तास गेलाला सुर्य दुसरे दिवशी पुन्हा उदय पावतो. पण ज्ञानदेव मात्र कायमचे दृष्टीआड झाले. "बाप ज्ञानेश्वर समाधीस्त" अशी प्रतिक्रिया व्यक्त झाली.

ज्ञानदेवांनी परमेश्वराजवळ मागीतलेले मागणे "पादपद्‌मी ठेवा" हे त्यांच्या विनम्र व्यक्तिमत्वाची दयोतक आहे. "माझे अस्तेपण लोपो नामरुप हरपो" अशी आकांक्षा बाळगणारे ज्ञानदेव दुसरे कोणते मागणे मागणार? आणि असे ज्ञानदेव समाधीस्त झाल्यावर "बाप" नाहीसा झाला असे उद्‌गार उमटणार नाहीत तर दुसरे कोणते निघणार!

निवृत्तीने बाहेर आणिल गोपाळा । घातिंयेली शिळा समाधीशी

सोपान, मुक्ताई सांडिती शरीरा । म्हणती धरा धरा निवृत्तीशी

आणिकांची तेथे उव्दिग्न ती मने । घालिताती सुमने समाधीसी

नामदेवे भावे कली असे पूजा । बापा ज्ञानराजा पुण्य पुरुषा

ज्ञानदेव समाधीस्त झाले आणि इतर जन असहाय्य निराधार झाले "पुण्य पुरुषा ज्ञानराजा" हि ज्ञानदेवांना उद्‌देशुन नामदेवांनी योजिलेली संबोधने ज्ञानदेवांचा यथोचित गौरव करणारी आहेत.

धन्य आळंकापुरी शिवपीठ शिवाचे । अगस्ति ऋषीच पूर्वस्थळ
त्रिवर्गी म्हणितले जाता जाता हरी । आंम्हा कौडण्यपूरी आज्ञा दयावी
इंद्रनिळ पर्वत नेमिला सोपानदेवा । तोवरी करी सेवा अंबिकेची
देव म्हणे भले आरंभिले तुम्हीं । आज्ञा घेतो आम्हीं पंढरीसी

देवाच्या पुढाकारामुळे आणि सक्रिय सहभागामुळे ज्ञानदेवांच्या समाधि प्रसंगाला तर वैभव प्राप्त झालेच पण भावंडांच्या समाधीची गौरवपूर्ण व्यवस्था झाली.

समाधी परिपूर्ण बेसले ज्ञानेश्वर । उठविले भार वैष्णवांचे
आलंकापूरी सव्य घेतली ते संती । दिली भागीरथी ज्ञानालागी
भैरवापासूनि उगम निरंतर । रानोमाळ झरे तिर्थ गंगा
सैंघ इंद्रायणी वाहाती मिळोनी । अखंड क्षणी वोघ जाती
चालिले विमान गंधर्व सुरगण । यात्रा परिपूर्ण जाली म्हणती
तीर्थ महोत्साह जाला सारासार । देव ऋषीश्वर परतले
वैष्णवांचे भार निघाले बाहेर । केला जयजयकार सर्वत्रांनी
पंढरीचा पोहा निघाला बाहेर । गरुडावरी स्वार देव जाले
नाम म्हणे ऐसा सुखी ज्ञानेश्वर । जाला असे स्थिर ब्रह्मबोधे

समाधीचा महोत्सव चांगला पार पडला असे देव व ऋषी बोलत आपापल्या ठिकाणी परतले. नामदेव म्हणाले ब्रह्मबोधामुळे ज्ञानेश्वर स्थिरावले आणि ब्रह्मानदांमुळे सुखी झाला.

या अभंगात ज्ञानदेवांच्या समाधि वर्णनाचा समारोप केला आहे. स्वस्वरुपी रममाण झालेल्या ज्ञानदेवांची समाधीची इच्छा पूरी झाली. एका परिपुर्ण पवित्र सोहळयास हजर राहता आले. यांचा आनंद गंधर्व, देवगण व संतसज्जन या सर्वांना अनुभवता आला.

ज्ञानदेवांच्या समाधि प्रसंगामुळेच सोपानादी भावंडांच्या समाधींची व्यवस्था निश्चित झाली. देवांने ज्ञानदेवांना दिलेल्या वचनाची पूर्तता केली पंढरपूराहून समाधीसाठी आळंदीला आलेले सारे सांप्रदायिक पुन्हा पंढरपूरला निघाले.

ज्ञानदेवांनी मनात जे आरंभले होते त्याची आता पुर्तता झाली. पार्थिव, अपार्थिवातले लौकिक, अलौकिकातले सारे व्दंव्द संपुष्टात आले आणि अंतिम एकत्वाच्या या परमानंदाच्या क्षणी समाधीच्या अभंगाचीही समाप्ती झाली.

## समारोपः-

महान "पुण्यपुरुषाच्या" संजीवन समाधीचे प्रत्यक्ष पाहून केलेले व करुण रसाच्या अकृत्रिम आणि सहज अविस्काराने वाचकांच्या डोळयात पाणी आणणारे हे वर्णन जुन्या मराठी वाङ्‌:मयाला भूषणभूत होऊन राहीले आहे.

त्यातील भावनांची उदात्तता, विशुध्दता, प्रेमळता आणि कारुण्यमयता काय वर्णावी? नामदेवांच्या सहजस्फुर्त अशा प्रासादिक आणि पवित्र वाङ्‌:मयाचा हे समाधीप्रकरण म्हणजे कळस आहे. यामध्ये नामदेवांचे सर्व उदात्त करुण व्यक्तितत्व त्यांच्या सहज शैलिने प्रकट झाले आहे.

नामदेव हे पराकाष्ठेच्या मृदू प्रकृतीचे आणि प्रेमळ मनाचे होते त्यांच्या अंतःकणाला अगदी लहानपणापासून विशुध्द भावनांची, ईश्वरी सह्रदयनेची आणि सत्पुरुषांच्या दिव्यचरित्रांची ओढ होती. सहा वर्षाच्या अखंड सहवासाने व संवादाने ज्ञानदेवांच्या महान व्यक्तिमत्वाची आणि त्यांच्या कार्याची योग्यता त्यांना जाणवली होती. उलट नामदेवांची दिव्य विरागिता, ज्ञानसंपन्नता, भक्तिभावांची उत्कटता व नम्रतेमुळे आलेली महानता ज्ञानेश्वरांनी ओळखली होती यामुळे ते एकमेकांचे सखे बनले होते. थोर पुरुषांची योग्यता ओळखणारे मनही तितकेच थोर असते. या समाधीप्रकरणाने आणि त्यातील उदात्त करुणाने, ज्ञानदेव आणि नामदेव हे दोन्ही थोर पुरुष मराठी वाङ्‌:मयात व महाराष्ट्रप्रदेशात चिरंजिव झाले आहेत.

हे सर्व अभंग लक्षपूर्वक वाचले म्हणजे ते नामदेवांनी लिहिले आहे की काय याबद्दल शंका येत. कित्येकांत नामदेवांचा रसाळपणा ओतप्रोत भरलेला आहे. यात शंका नाही. तरीपण कोणी नामदेव भक्तांनी ज्ञानदेव, नामदेव चरित्रावर लिहिलें असावेत. या अभंगामधून अतिशयोक्ति आणि काल्पनिक वर्णने ही ब-याच ठिकाणी आहेत आणि चमत्कारही भरपूर आहेत.

अनैसर्गिक चमत्कार सोडून दिले तरी एकविसी पूरी होण्याच्यापूर्वी

ज्ञानदेवांनी, सतरा वर्षे पूरी होण्यापूर्वी मुक्ताबाईने जे बुध्दीचे आणि सोशिकपणाचे चमत्कार करुन दाखविले. खरोखर ते अलौकिक आहेत. "ज्ञानेश्वरी" ची रचना पंधराव्या वर्षी आणि "अमृतानुभावाची" रचना अठराव्या वर्षी हे वाङ्:मय सृष्टीतले चमत्कार खरोखर मनुष्याच्या कल्पनेला थक्क करतात ज्ञानदेवांचे ग्रंथ हे त्यांनी कायमचे वैभव महाराष्ट्राला दिले आहे.

**"आदि, तीर्थावळी आणि समाधी" या त्रीविध पदय लेखनातून प्रकटणारे ज्ञानेश्वरांचे एकसंघ व्यक्तिमत्व:-**

जगाच्या अनुभवातून ताऊन सुलाखून निघालेले जगाच्या कसोटीला उतरलेले ज्ञानेश्वर बाल वयातच विचाराने, आचाराने, प्रौढत्वाने वागू लागले. स्वत: सर्व जगाची माऊली होवून राहिले. माऊलीची माया न अनुभवणारे परंतु सर्व जगाला ती माया देणारे ठरले. या बालकाने लहान वयातच भाऊ, आई, वडील या सर्व जबाबदा-या पार पाडल्या.

"ज्ञानराज माझी योग्यांची माऊली । जेणे निगमवाली प्रकट कली ॥

लहान वयातच ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव, पासष्ठी इत्यादी ग्रंथ लिहिले. ब्रम्हानंदलहरी, अध्यात्मविद्या, चैतन्याचा दिप उजळून सर्व महाराष्ट्र झळकून टाकला.

ज्ञानेश्वरीच्या रचनेनंतर पंढरपूर येथे यात्रेस गेल्यावर तेथे ज्ञानदेव व नामदेव यांची गाठ पडून दोघांचा उत्तम स्नेह जमला व पुढे दोघांनी मिळून कित्येक महिने तिर्थयात्रेत घालवले.

ज्ञानदेव अंतर्यामी आत्मस्वरुपात तिर्थरुप होते. पण देहाला तपश्चर्या, आत्मसंयम, प्रक्षालन व्हावे हे त्यांनी पटवून दिले. विठ्ठलाला सुध्दा ज्ञानेश्वरांची "तीर्थरुपता" पटली होती.

प्रत्यक्ष परब्रह्ममुर्ती ज्ञानेश्वर । करीतसे आदर संगतीच ।

असे उद्गार प्रत्यक्ष पांडुरंगांचे आहेत.

ज्ञानेश्वर आता मुमुक्षू अवस्था संपून ज्ञानी भक्ताच्या भुमीकेवर आरुढ झाले होते. त्यांनी अंव्दैतता अनुभवली आहे. जन्ममरण नसणारे परमात्मा स्वरुप

तत्वरुप त्यांनी अनुभवले आहे.

ज्ञानेश्वरांनी वयाला एकविस वर्षे पुर्ण झाल्यावर आळंदी येथे समाधी घेतली. ज्ञानेश्वरीच्या रचनेनंतर त्यांच्याबद्‌दल महाराष्ट्रात एक आदर बुध्दी निर्माण झाली. त्यानंतर मात्र त्यांचा महापुरुष म्हणून सन्मान झाला. बालवयात लोकछळाचा अनुभव घेतल्यानंतर पुढे आपल्या बुध्दीच्या, विदयेच्या, सद्‌वर्तनाच्या प्रभावाने, आपल्या अद्‌भूत ग्रंथरचना सामर्थ्याने जगाला आश्चर्यचकीत करुन सोडले. आणि मग सहस्त्रावधि लोकांची मस्तके चरणांवर नम्र होऊ लागली.

मराठी भाषेत ब्रह्मविदयेचा सुकाळ करुन मराठी भाषेला संस्कृताच्या बरोबरीने सिंहासनाधिष्टित केले. संस्कृतमध्ये बंदिस्त झालेली अध्यात्म विदया सामान्य जनांना समजण्यासाठी त्याची मराठीतून चर्चा केली. हे महान कार्य झाल्याबरोबर संसारातून निवृत्त होऊन समाधि सुरुवात दंग होण्याची वृत्ती व या वृत्तीमधून त्यांचे अमानवित्व लक्षात येते.

ज्ञानदेव आपल्यातून जाणार या कल्पनेने प्रत्यक्ष पांडुरंगही गहिवरला यावरुन ज्ञानेश्वरांचा मोठेपणा लक्षात येतो. ज्ञानेश्वर हे ईश्वरांचे प्रत्यक्ष मुर्तीमंत रुप.होते. ज्ञानेश्वर आता ऐक्याप्रत पोहचले होते. नामदेवांपेक्षा, निवृत्तीपेक्षा वयाने लहान असणारे ज्ञानेश्वर ब्रह्मस्वरुप स्थितीत पाहून त्यांना वियोग कल्पनेने असहय होते आहे. ज्ञानेश्वरी लौकिकाचे सारे मायापाश, बंध तोडून अलौकिकात विलिन झाले आहेत.

समाधि प्रकरणातून ज्ञानेश्वरांची श्रेष्ठता, महत्व, त्यांची गुरुभक्ती, विनम्रता इत्यादी गुण दिसून येतात. पंधराव्या वर्षी ज्ञानेश्वरीची रचना आणि अठराव्या वर्षी अमृतानुभावाची रचना हे वाङ्‌मय सृष्टीतले चमत्कार मनुष्याच्या कल्पनेला थक्क करतात. ग्रंथ हे त्यांचे महाराष्ट्राला मिळालेले कायमचे वैभव आहे. त्यांच्या लौकिक चरित्रापेक्षा त्यांच्या चिंतनिकेला अत्यंत महत्व आहे हे त्यांच्या चरित्रावरुन लक्षात येते.

**<u>नामदेवांची नवविधाभक्ती:-</u>**

नामदेव स्वत: बालपणापासून भक्तिमार्गाचे पाईक आहेत. त्यांच्या कुलाचीच ती परंपरा आहे. त्यांनी भक्तिमार्गाला प्राधान्य देऊन निरुपण केले आहे. या भक्तीमार्गाला नामदेव 'विठोबाचापंथ' म्हणतात. हे लक्षणीय आहे "वेगी विठोबाचा पंथ धरा", "तो हा राजमार्ग सर्वाहोती चांग" अशी ते ग्वाही देतात. अव्दैत आणि सगुण भक्ती यांच्या समन्वयातून भक्तिमार्गाची उंची वाढवली, नामाला प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली आणि भक्तिमार्गाचे कौतुक गाणा-या वारकरी संप्रदायाचा महानद विस्तारला.

नामदेवांनी अत्यंत डोळसपणे [३०]भक्तिमार्गाची कास धरली. समाजाच्या अभ्यासातून त्यांना जाणवले की वेदविद्येचा अभ्यास केलेले ज्ञानवंत लोक अहंकारानी माजले होते. शास्त्र जाणणारे गर्वाने उध्दट झाले होते आणि हरिदास हे ईश्वराच्या भावाशिवाय केवळ पैशावर नजर ठेवून कीर्तन प्रवचनादी करीत होते. टिळे-टोपी-माळा अशा मुद्रांनी लोकांना फसविणा-या बुवाबाजिला उत आलेला होता. वरवर गोसावीपणाचा वेश दाखविणारे, अंतरात मात्र विषयांमध्ये लडबडले होते. ख-या भावाचा भूकेला एकही नाही हे नागदेवांनी जाणले आणि म्हणूनच ख-या भक्तिमार्गाची कास धरुन आपल्या भोवतीच्या लोकांना सन्मार्गास लावणे आणि विठ्ठलभक्तिचे मर्म त्यांच्या मनावर बिंबवणे हे नामदेवांचे जीवनकार्यच होते.

## संदर्भ टीपा:-


०१) श्री नामदेव गाथा - (१९७०)

महाराष्ट्र शासन - शासकीय मध्यवर्ती

मुद्रणालय, मुंबई - पृ.क. २० ते २२

०२) बाप ज्ञानेश्वर समाधिस्त -

विलास खोले - प्रतिमा प्रकाशन -पृ.क.११

०३) श्री नामदेव गाथा - (१९७०)

महाराष्ट्र शासन - शासकीय मध्यवर्ती

मुद्रणालय, मुंबई - पृ.क. २२ ते २३

०४) प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास - भाग पहिला

उत्तरार्थ - अ.ना. देशपांडे -

व्हीनस प्रकाशन पुणे - पृ.क. २०५

०५) तत्रैव पृ.क.२०६, २०७

०६) ज्ञानेश्वर चरित्र प्रा.माधव दामोदर आळतेकर

०७) मराठी वाङ्‌मयाचा इतिहास . खंड पहिला

०८) श्री नामदेव गाथा - (१९७०)

महाराष्ट्र शासन - शासकीय मध्यवर्ती

मुद्रणालय, मुंबई - पृ.क. ३३४

अभंग - श्री ज्ञानेश्वरांची आदि - ८९९

०९) ज्ञानेश्वर चरित्र - प्रा.माधव दामोदर आळतेकर

१०) प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास - भाग पहिला - उत्तरार्ध

अ.ना. देशपाडे - व्हीनस प्रकाशन पुणे. पृ.क. २१३, २१४

११) श्री नामदेव गाथा - (१९७०)

महाराष्ट्र शासन - शासकीय मध्यवर्ती

मुद्रणालय, मुंबई - पृ.क. ३३२

अभंग श्री ज्ञानेश्वरांची आदि ८९३ - ७, ८

१२) तत्रैव पृ.क.३३३, अभंग ८९५-७,८

१३) तत्रैव पृ.क.३३४, अभंग ८९७, १८,१९

पृ.क.३३५ -अभंग ९०२, १ ते ६

१४) प्राचीन मराठी वाङ्‌मयाचा इतिहास - भाग पहिला

उत्तरार्ध - अ.ना. देशपाडे - व्हीनस प्रकाशन पुणे.

पृ.क. २१६

१५) ज्ञानदेव आणि नामदेव - शं.दा. पेंडसे, पृ.क.३८१

१६) श्री नामदेव गाथा - (१९७०)

महाराष्ट्र शासन - शासकीय मध्यवर्ती

मुद्रणालय, मुंबई - पृ.क. ३७७

अभंग - तीर्थावळी - ९६४ १ ते ४

१७) तत्रैव पृ.क.३३९, अभंग -तीर्थावळी -९०३ १ ते ४

१८) ज्ञानेश्वर चरित्र - प्रा.माधव दामोदर आळतेकर

वरदा सेनापती बापट मार्ग, पुणे १६

१९) श्री नामदेव गाथा - (१९७०)

महाराष्ट्र शासन - शासकीय मध्यवर्ती

मुद्रणालय, मुंबई - अभंग - तीर्थावळी -

पृ.क. ९०८ १-२, १०ते१५

२०) ज्ञानदेव आणि नामदेव - शं.दा. पेंडसे, पृ.क.३९२

२१) तत्रैव पृ.क.३९४,

२२) तत्रैव पृ.क.४०१,

२३) बाप ज्ञानेश्वर समाधिस्त -

विलास खोले - प्रतिमा प्रकाशन

पृ.क.१२

२४) तत्रैव पृ.क.४४,

२५) तत्रैव पृ.क.६९,

२६) श्री नामदेव गाथा -(१९७०)
महाराष्ट्र शासन - शासकीय मध्यवर्ती
मुद्रणालय, मुंबई - पृ.क. ४३६.
समाधि अभंग - १०३०, १ ते ५

२७) तत्रैव पृ.क.४३७, समाधि अभंग, १०३२

२८) तत्रैव पृ.क.४४०, समाधि अभंग, १०४६

२९) बाप ज्ञानेश्वर समाधिस्त -
विलास खोले - प्रतिमा प्रकाशन
पृ.क.१०४ ते १२४

३०) संत नामदेवांचा भक्तियोग - डॉ. शंकर अभ्यंकर
आदित्य प्रतिष्ठान पुणे
पृ.क. ११८ ते १३४